किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

11-10-06


३ ●आनंदोत्सव

★ उत्सव प्रकाशाचा ★

८ ★ महोत्सव आकाशकंदिलांचा (चीन)

१४ ★ तरंगता दीपोत्सव (थायलंड)

१७ ★ वीरश्रीच्या आठवणीत... (इस्त्रायल)

२२ ★ प्रकाशाची राणी (स्वीडन, नॉर्वे)

२४ ●शताब्दी एका 'मिशन'ची

३० ● परिचय : मल्टिकल्चरलिझम

३२ ●जिकडे तिकडे

● शांततेसाठी धर्मपरिषद !

३४ ●'काल' चे 'आजसाठी'

(..... त्याची खरी दसरा दिवाळी)


खंड ५ : अंक ७ ऑक्टोबर २००६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**

**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**, अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेलः ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ५ (अंक ७) ऑक्टोबर २००६**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

***'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?***

- **उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक**
- **अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक**
- **नि:पक्ष व साधार**
- **सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक**
- **हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी**

***'अर्थबोधपत्रिके'चा हेतू***

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

***'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?***

- **मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन**
- **निवडक साहित्याचे संकलन**
- **संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड**
- **संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# आनंदोत्सव

'अर्थबोधपत्रिके'च्या कुटुंबातील सर्व लहानथोरांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा. 'पत्रिके'चा हा अंक हातात पडेपर्यंत दसरा होऊन गेला असेल तर दिवाळी साधारणपणे आठवडाभरावर येऊन ठेपली असेल. दिवाळीची लगबग खरे म्हणजे दसऱ्यापासूनच सुरू होते. दिवाळी हा खरोखरच एक आनंदोत्सव. शेवटी सण-उत्सवांचे तरी प्रयोजन काय ? पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी संपादन केलेल्या भारतीय संस्कृतिकोशात 'उत्सव' या संकल्पनेची उद्‌धृत केलेली व्याख्या मोठी मननीय आहे. 'निश्चितपणे आल्हाद उत्पन्न करणारा व्यापार म्हणजे उद्योग तोच उत्सव होय', अशी 'शब्दकल्पद्रुमा'ने दिलेली 'उत्सव' या शब्दाची व्याख्या संस्कृतिकोशाच्या पहिल्या खंडात नोंदविलेली आहे. मानवी जीवनात आनंदोत्साह निर्माण करणे, हे सण-उत्सवांचे आद्य प्रयोजन. आनंद कोणाला नको असतो ? माणूस हा उत्सवप्रिय प्राणी आहे, असे म्हणत असावेत ते कदाचित म्हणूनच. रोजच्या जगण्याच्या रहाटगाडग्याला जुंपलेल्या माणूसप्राण्याला त्या धबडग्यातून अंमळ विसावा मिळावा, चार दिवस आप्तेष्ट-सुहृदांसह ललितकलांचा, गोडधोडाचा आस्वाद घेण्यास त्यास अवसर मिळावा आणि त्याद्वारे शरीर व मनाला तजेला मिळून जगण्यातील त्याची उमेद वाढावी, हा उत्सवांचा आद्य हेतू. त्यातही पुन्हा दिवाळीचे माहात्म्य आगळेच. दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव. मनुष्यप्राण्याला प्रकाशाचे आकर्षण अनादी कालापासून वाटत आले आहे. मानवी जीवनाचे धारण-पोषण होण्यासाठी आवश्यक असणारी उष्णता, ऊर्जा, ऊब, धग या बाबी प्रकाशापासूनच मिळत असल्याने आदिमानवाच्या भौतिक जीवनव्यवहारात केंद्रवर्ती स्थान मिळविलेल्या प्रकाशाने एकंदरच मानवी उत्क्रांतीच्या प्रदीर्घ प्रवासात प्रगत मानवाच्या सांस्कृतिक विचारविश्वातही अग्रपूजेचा मान पटकाविला. याच प्रक्रियेत पुढे मग 'प्रकाश' आणि त्याच्या सापेक्ष असणारा 'अंधार' या निव्वळ भौतिक-भौगोलिक अवस्था न राहता त्यांना परस्परविरोधी प्रवृत्ती-मूल्यांचा साज चढवला गेला. मानवी जीवनातील औदासिन्य, दैन्य, अज्ञान, कुंठितता, अधोगती,

*(पान ५ वर पाहावे)*

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'च्या जुलै महिन्यांच्या अंकातील अणूऊर्जाविषयक लेख (अणुऊर्जा : निर्मिती व धोके) अत्यंत अपुरा आणि असामाधानकारक वाटला. अणूऊर्जेचे समर्थन करण्यासाठी तिचे महाभयंकर धोके लपविण्याची वा सौम्य करून सांगण्याची लबाडी गेली ५० वर्षे सुरू आहे. ती 'स्वच्छ, स्वस्त व सुरक्षित' असल्याचे ढोल प्रारंभी बडविले गेले. पण, आता हे तीनही भोपळे भ्रमाचे असल्याचे कळून चुकलेले आहे. कमालीची अपघातप्रवण आणि अपघातग्रस्त अशी ही ऊर्जा वेळोवेळी सुरक्षिततेचे उपाय वाढत्या प्रमाणावर योजावे लागल्याने महागही बनत गेली आहे. ऊर्जानिर्मितीच्या प्रक्रियेअंती तयार होणाऱ्या किरणोत्सर्गी ऊर्जा-उर्वरितांमधून पुढील अगणित वर्षे किरणोत्सर्ग चालूच राहतो. त्याचा उपद्रव होऊ नये म्हणून ही उर्वरिते कशा प्रकारे सीलबंद करून ठेवावयाची, याबाबतची उपाययोजना, त्यासाठीचा खर्च या कोणत्याही बाबी लक्षात न घेता ही ऊर्जा 'किफायतशीर', 'सुरक्षित' आहे, असे म्हणणे ही शुद्ध लबाडी आहे. दुसरी बाब म्हणजे, 'अणुविजेमुळे कर्ब वायूचे उत्सर्जन होत नाही', हे विधानही अर्धसत्यच आहे. असे उत्सर्जन प्रत्यक्ष भंजन-विक्रियेत होत नाही, एवढेच. त्या आधीच्या सर्व प्रक्रियांत (उत्खनन, शुद्धिकरण, संपन्नीकरण, वाहतूक इत्यादी) कर्ब वायूचे उत्सर्जन होतेच. केवळ इतकेच नाही तर, उर्वरितांवर करावयाच्या प्रक्रियांदरम्यान तसेच वाहतूकीतही ते होते. महत्त्वाचे म्हणजे, या किरणोत्सर्गातून जे प्रदूषण होते ते काचघर वायूंपेक्षाही शेकडो पटींनी घातक असते. अणुऊर्जेशी संबंधित प्रकल्पांद्वारे प्रतिवर्षी कमी-अधिक तीव्रतेची जी टनावारी उर्वरिते तयार होतात त्यांचे काय करावयाचे हे आज कोणालाही ठाऊक नाही. अणुवीज केंद्रे मोडीत कशी काढावयाची, हेही कोणाला माहित नाही. या सगळ्याला येणारा खर्च कोणत्या हिशेबात धरावयाचा ? आपल्या लेखात या पैकी कोणत्याही बाबीचा उल्लेखदेखील नाही ! लेखातील सामग्रीसाठी आधार म्हणून वापरलेले संदर्भस्त्रोत अपुरे असल्यामुळे असे झाले असावे. या विषयाचे सखोल विवेचन करणारी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांच्या आधारे या विषयासंदर्भातील अन्य वास्तव व विश्वासार्ह माहिती आपण आपल्या अंकातून केव्हातरी द्यावी, असे सुचवावेसे वाटते.

**दिलीप कुलकर्णी, कुडावळे, रत्नागिरी.**

*(पृष्ठ क्रमांक ३६ वर पाहावे)*

(पान ३ वरून)
ऱ्हास, मृत्यू, पराभूतता यांसारख्या अवघ्या प्रतिकूल, अनिष्ट आणि म्हणूनच अवांछनीय असणाऱ्या बाबींची सांगड अंधाराशी घातली गेली. तर, याच्या बरोबर उलट, म्हणजे, प्रगती, उत्कर्ष, सुबत्ता, समृद्धी, विजय, जीवनेच्छा, उत्साह, विवेक, ज्ञान यांसारख्या साऱ्या सुभग, सात्विक आणि मानवी जीवनव्यवहार संपन्न बनविणाऱ्या मूल्यांचे साहचर्य प्रकाशाशी जोडले गेले. जीवनाचा प्रवाह हा सतत अधमाकडून उत्तमाकडे वाहता राहावा, या धारणेनुसार मग प्रकाशाची उपासना हाच मानवी संस्कृतीचा मूलाधार बनला. सात्विक प्रकाशाची आराधना करावयाची तर मग तामसी तमाचा उच्छेद हा अनिवार्यच ठरतो. प्रकाश आणि अंधाराची लढाई सुरू होते ती अशी. प्रकाश हे जीवनाचे प्रतीक मानले गेले असल्याने प्रकाशाचे म्हणजेच पर्यायाने जीवनाचे सातत्य हे टिकून राहिले पाहिजे, हा विचार एकंदरच मानवी विचारविश्वात प्राचीन काळापासून रुजला. साहजिकच, जीवनप्रवाहाची अक्षुण्णता ज्या ज्या गोष्टींमुळे टिकून राहील त्या त्या बाबींची मानवी व्यवहारांतील महत्ता ही स्वयंसिद्ध बनली. मानवासह यच्चयावत जीवमात्रांचे जगणे-वाढणे हे अन्नावर अवलंबून आहे. अन्नधान्याची मुबलकता, पुरेसे पाणी, फळफळावळ, धनसंपत्ती या साऱ्या बाबी जीवनाचे सातत्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने कळीच्या ठरतात. पुरेसे अन्नधान्य नसेल तर जीवाचे भरणपोषण नीट होणार नाही. वंशवेल वाढणार नाही. त्यामुळे अन्नाची शाश्वती ही प्राचीन काळापासून मानवी समूहाची अग्रक्रमाची बाब राहिलेली आहे. संपूर्ण जगभरच, जिथे जिथे म्हणून मानववंशाची उत्पत्ती व वाढ झाली तिथे मानवी अस्तित्वाचा केंद्रबिंदू हाच राहिलेला दिसतो. अन्नोत्पादन हे पावसावर निर्भर आहे. पर्यायाने, उभे मानवी जीवनच प्रारंभापासून पावसाच्या पंचांगाभोवती गुंफले गेले. यातूनच, मानवी व्यवहारांतील प्राधान्यक्रम साकारला. अन्न, पाणी, पाऊस, जमिनीची उपलब्धता व सुपीकता या बाबी मूलभूत गरजेच्या ठरल्या. या चीजांची वेळेवर व पुरेशा प्रमाणात होणारी उपलब्धता हाच चिरंतन चिंतेचा (आणि चिंतनाचाही) विषय बनला. विज्ञान-तंत्रज्ञानाचा उगम कल्पनेच्या परिघातही नसलेल्या उत्क्रांतीच्या टप्प्यावर, पावसाचे चक्र आणि त्यातील फेरफार जाणणे,

त्यातील अनियमिततांची झळ जीवनव्यवहाराला लागू नये यासाठी उचित अशी उपाययोजना करणे, यांसारख्या बाबी केवळ अशक्यच होत्या. त्यामुळे, निसर्गचक्र सुरळीत चालले, पुरेसा पाऊस आणि तोही पुन्हा वेळेवर आला, भूमीने उदारपणे झोळीत मुबलक धान्यधुन्य घातले की जीवनात अन्नाची शाश्वती निर्माण होऊन ते खचितच आल्हाददायक बनेल, ही खुणगाठ मानवी संस्कृतीत पक्की झाली. सण आणि उत्सवांची मोट निसर्गातील चक्राशी, ऋतूपालटाशी बांधली गेली ती याच कार्यकारणभावातून. मानवी जीवनसंस्कृतीच्या उत्क्रांतीच्या वाटेवरील एका फार मोठ्या टप्प्याचे सूचन इथे घडते. आपल्याकडील दिवाळीच्या दीपोत्सवाचे वेळापत्रक हे असेच ऋतूचक्राशी गुंफलेले आहे. शिवारातील मुख्य पिके तयार झाली, पाऊस उघडला आणि ऋतूपालट होऊन थंडीची चाहूल लागली की अवघ्या वातावरणातच जो उत्साह भरून उरतो त्या आल्हादाचे कोंदण लाभते दिवाळीच्या आनंदोत्सवाला. त्यामुळे, प्रत्येक वर्षीच्या दिवाळीच्या आनंदाची प्रतवारी ही पावसाच्या लहरीपणानुसार शेताशिवारात तरारलेल्या पैसेवारीवर ठरते. पाऊस जितका नियमित व पुरेसा तितके पीकपाणी मुबलक. तयार झालेले पीक घरी येते तेव्हा त्याचे स्वागत करावयाचे ते झगमगत्या आकाशदिव्यांनी, स्निग्ध पणत्यांच्या नयनमनोहर रोषणाईने आणि फटाक्यांच्या दणदणाटाने. कारण, अन्नधान्याची शाश्वती आणि त्यातून उमलणाऱ्या समृद्ध जीवनाची हमी दडलेली असते ती काठोकाठ भरलेल्या कणग्यांच्या पोटात. जीवनाच्या सातत्याची आश्वस्त करणारी निर्धास्तता ही दिवाळीच्या चार दिवसांमध्ये उजळलेल्या लक्ष लक्ष दिव्यांच्या ज्योतींद्वारे प्रकाशमान होत असते. हा आनंदोत्सव असतो प्रकाशाचा, जीवनाच्या सातत्याचा, त्या सातत्याचा मार्ग कुंठित करणाऱ्या भुकेवर मिळवलेल्या विजयाचा. भारतीय संस्कृतीमध्ये, सांस्कृतिक तसेच वैचारिक उत्क्रांतीच्या एका टप्प्यावर भूक आणि मृत्यू यांना समानधर्मा का लेखले जात असे, याचे रहस्य इथे उलगडते. जीवनप्रवाहाचा ओघ अवरुद्ध करण्यास कारणभूत ठरणारे हे दोन घटक. दिवाळीमध्ये दीपदान करण्यामागे संकेत आहे तो यमयातना टाळण्याचा. धनत्रयोदशीच्या दिवशी दीपदान केल्याने अपमृत्यू टळतो, अशी धारणा आहे. केवळ जीवनाच्या सातत्याची हमी मिळून भागत नाही.

जीवनात सुबत्ताही हवी. आश्विन अमावास्येच्या दिवशी लक्ष्मीपूजन करावयाचे ते त्याचसाठी. लक्ष्मीला प्रसन्न करून घेणे ही मानवाची आकांक्षा पूर्वापारची आहे. आजच्या प्रचलित आधुनिक विचारप्रणालीचा मागमूसही नसलेल्या त्या प्राचीन काळातील मानवाच्या या साऱ्या खुळचट कल्पना, अशी त्यांची संभावना काहीजण आजमितीस करतील. त्या साऱ्या कल्पना खऱ्या की भ्रामक, हा विचार एकवेळ बाजूला ठेवू. त्याबाबत वितंडवाद उदंड घातला तरी, या साऱ्या संकेत-संकल्पनांमधून मानवाची जबर जीवनेच्छा आणि जीवनसातत्याप्रतीची असोशीच प्रतिबिंबित होते, हे चिरंतन सत्य मात्र निर्विवाद मान्य करावेच लागेल. आदिम काळापासून चालत आलेल्या मूलभूत जीवनगरजांच्या पूर्ततेची हमी मिळण्यामुळे आनंदोत्सव साजरा करण्याच्या सहजप्रवृत्तींचे सण-उत्सवांशी असणारे हे साहचर्य केवळ भारतीय संस्कृतीचेच वैशिष्ट्य आहे, असे मुळीच नाही. दिवाळीच्या धर्तीवर, अन्य देशांतही प्रकाशाचा महोत्सव आज कित्येक शतके साजरा केला जात आहे. त्याला स्थानिक परिभाषेत नावे काय ती निरनिराळी आहेत, इतकेच. आशियाई चीनपासून ते थेट स्वीडन-नॉर्वेसारख्या स्कॅन्डेनेवियन देशांमध्ये प्रकाशाच्या सोहोळ्याची प्रदीर्घ परंपरा आहे. देशोदेशीच्या प्रकाशसोहळ्यांचे रंजक विभ्रम 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात मांडले आहेत. प्रकाशोत्सव साजरा करण्यामागील ठायीठायीच्या प्रेरणाही आपल्याप्रमाणेच कृषिसंस्कृतीशी तसेच ऋतूपालटाशी जुळलेल्या आहेत. वरुणराजाचे आभार मानणे, हीच थायलंडमधील दीपोत्सवामागील ऊर्मी असल्याचे स्पष्ट होते तेव्हा जगाच्या विभिन्न भूभागांवरील मानवी संस्कृतीच्या परस्परांशी गुंफल्या गेलेल्या अदृश्य धाग्यांचे विश्वच एकदम प्रकाशमान होते... लुकलुकणाऱ्या अगणित आकाशकंदिलांच्या प्रकाशाने उजळून निघालेल्या दिवाळीतील आभाळाप्रमाणे. देशादेशांमधील मानवी समाजजीवन आज प्रगतीच्या विभिन्न टप्प्यांवर उभे असल्याचे दिसत असले तरी, उत्क्रांतीच्या प्रवासात त्याच्या अनुभवास आलेल्या वाकवळणांमध्ये कोठेतरी समानता असल्याची प्रचिती येते ती संस्कृती-संस्कृतींमधील या साधर्म्यामुळेच. सांस्कृतिक जागतिकीकरणाचा आविष्कार म्हणावयाचा तो हाच. प्रकाशाचा आनंदोत्सव साजरा करायचा तो एवढ्यासाठीच !

# महोत्सव आकाशकंदिलांचा

**सण प्रकाशाचा**.... मनामनांतील आनंदाचा, ओसंडणाऱ्या उत्साहाचा, सळसळत्या चैतन्याचा !

**सण प्रकाशाचा**.... सुमंगल पहाटेचा, क्षात्रतेजाचा, सुखसमृद्धीचा !

**सण प्रकाशाचा**.... गृहलक्ष्मीच्या कौतुकाचा, बहिणभावांच्या प्रेमाचा, सुहृदांच्या भेटीगाठींचा, मनसोक्त खरेदीचा व आकर्षक भेटींचा !

**सण प्रकाशाचा**.... भरपूर सुट्टीचा व हुंदडण्याचा, मातीच्या किल्ल्यांचा, स्वादिष्ट फराळाचा !

**सण प्रकाशाचा**.... शांत ज्योतींचा, झगमगणाऱ्या दिव्यांचा, बहुरंगी आकाशकंदिलांचा आणि बहुढंगी फटाक्यांचा !

**सण प्रकाशाचा**..... भारतीय संस्कृतीचा !

••

अंधारातून प्रकाशाकडे, स्थितीतून सुस्थितीकडे आणि भूतकाळातून भविष्याकडे जाण्याची मानवी जीवनाची ओढ या सांस्कृतिक सणातून व्यक्त होते. अशी ओढ वाटणे हे मानवी मनाचे वैशिष्ट्यच आहे. देशादेशांमधील (धूसर होत असलेल्या ?) सीमारेषांमुळे समाजगट बदलले, संस्कृती बदलली तरी मानवी मनाचे हे वैशिष्ट्य टिकलेले आढळते. हे वैशिष्ट्य लेवून प्रकाशाचा उत्सव साजरा करणाऱ्या अशा काही समाज-संस्कृतींची ही रंजक तितकीच उद्बोधक ओळख.

'लाल' रंगाला जवळ केलेल्या व आशियातील महासत्ता असणाऱ्या (आणि जागतिक महासत्तेची स्वप्ने पाहणाऱ्या ?) चीनचा नव्या वर्षात प्रवेश होतो जानेवारीच्या अखेरीस वा फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात. सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे जंगी स्वागत हा चिनी संस्कृतीचा अविभाज्य घटक. जंगी म्हणजे तब्बल १५ दिवस ! नवीन वर्षाच्या स्वागताचाच एक भाग म्हणजे आकाशकंदील महोत्सव. या वेळी मुख्य आकर्षण असते ते 'ड्रॅगन परेड'चे व फटाक्यांच्या आतषबाजीचे. चीनच्या नव्या वर्षाबाबत आख्यायिकाही आहेत.

एक कथा अशी आहे की, शेकडो वर्षांपूर्वी, चीनमध्ये निआन नावाचा एक हिंस्त्र प्राणी होता. नवीन वर्षाचा दिवस उजाडण्याच्या आधी मध्यरात्री या प्राण्याने गावागावांमधील रहिवाशांवर हल्ला चढविला व त्यांना गिळंकृत करण्यास प्रारंभ केला. रहिवासी घाबरले. मग एका गावातील एका शूर व ज्येष्ठ व्यक्तीने निआनला सुचविले की या नागरिकांना खाण्यापेक्षा त्याने नागरिकांना त्रास देणाऱ्या इतर हिंस्त्र प्राण्यांना खावे. निआनला ते मान्य झाल्याने निआनच्या तावडीतून सुटण्यासाठी सर्व प्राण्यांना जंगलाकडे धाव घेतली. या घटनेनंतर ती ज्येष्ठ व्यक्ती निआनच्या पाठीवर स्वार होऊन विजयी मुद्रेने गावाकडे परतली. संकटातून मुक्त केल्यामुळे सर्व रहिवाशांनी या ज्येष्ठ व्यक्तीचे आभार मानले. कालांतराने, आपल्या मृत्युपूर्वी या ज्येष्ठ व्यक्तीने सर्व नागरिकांना असे सांगितले की हिंस्त्र प्राणी 'लाल' रंगाला घाबरत असल्यामुळे नवीन वर्षाच्या प्रारंभी सर्वांनी 'लाल' रंगाचे कागद वापरून आपापल्या घरांचे दरवाजे व खिडक्या सजवावेत. 'लाल' रंग हा चीनमध्ये सौख्याचा व उत्साहाचा मानला जातो. याचबरोबर सोनेरी रंगालाही चिनी संस्कृतीत महत्त्व आहे ते संपत्ती व सुदैव यांचे प्रतिनिधित्व करणारा म्हणून. त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत लाल व सोनेरी रंगानी सजावट करून केले जाते. हळूहळू हिंस्त्र प्राण्यांना घाबरविण्यासाठी फटाक्यांचा वापर करण्याचाही प्रघात पडला (त्याचे कारण असे असावे की बंदुकीच्या गोळ्यांची पावडर प्रथम चीनमध्येच तयार करण्यात आली होती).

नवीन वर्षाच्या या उत्सवाला 'वसंतोत्सव' (स्प्रिंग फेस्टिवल) असेही म्हटले जाते. कारण, फेब्रुवारीच्या सुरुवातीचा हा काळ म्हणजे वसंत ऋतुच्या आगमनाची चाहूल असते. या संदर्भात अशी एक कथा आहे की, या वेळी फटाक्यांच्या आवाजाने ड्रॅगन जागा होतो आणि आकाशात झेप घेतो. त्याच्या उडण्यामुळे वसंतात पाऊस पडतो व पिके बहरतात. तर काहींच्या मते आतषबाजीमुळे वाईट तत्त्वे व दुर्दैवी घटना दूर पळून नवे वर्ष सुखाचे जाते. किंबहुना, यासाठीच बंदुकीच्या गोळ्यांची पावडर तयार करण्यात आली, असेही म्हटले जाते.

इंग्रजी कॅलेंडरनुसार चीनचे नवे वर्ष २० जानेवारी ते २० फेब्रुवारी या दरम्यान केव्हा तरी चालू होते. कारण, चीनमध्ये पूर्वी चांद्रमासाप्रमाणे कालगणना करण्यात येत होती. त्यानुसार चालू वर्षाचा शेवटचा महिना संपल्यानंतर येणारी अमावस्या हा नवीन वर्षाचा पहिला दिवस. अमावस्येकडून पौर्णिमेकडे होणारा चंद्राचा प्रवास म्हणजे हे नववर्षाचे पहिले पंधरा दिवस होय (जानेवारी ते डिसेंबर अशी पाश्चात्यांची कालगणना

चीनने १९११ मध्ये स्वीकारली). आता तेथील कॅलेंडरमध्ये चिनी पद्धतीची तसेच आधुनिक पद्धतीची कालगणना दर्शविलेली असते. २००७ मध्ये चीनच्या नव्या वर्षाची सुरुवात १८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. चिनी नव्या वर्षाची आणखी एक गंमत म्हणजे प्रत्येक वर्षाला एका प्राण्याचे नाव देण्यात आलेले असते. असे बारा प्राणी असून दर बारा वर्षांनी एका प्राण्याचा क्रमांक लागतो. २००७चे नवे वर्ष हे वराहाचे (pig/boar) वर्ष आहे. पुन्हा १२ वर्षांनी म्हणजे २०१९ मध्ये या प्राण्याचे वर्ष येईल. अशा विशिष्ट प्राण्याच्या वर्षांमध्ये जन्म झालेल्या व्यक्तींची विशिष्ट स्वभाववैशिष्ट्ये असतात असेही म्हटले जाते. उदाहरणार्थ, बारा वर्षांपूर्वी म्हणजे १९९५ मध्ये जन्म झालेल्या (तसेच २००७ व २०१९ मध्ये जन्मणाऱ्या) व्यक्तींमध्ये काही प्रमाणात ज्ञानलालसा असते, जीवनातील प्रश्नांना थेटपणे भिडण्याचा त्यांचा स्वभाव असतो, तसेच ते प्रश्न प्रामाणिकपणे सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, इत्यादी.

## नववर्षाची पूर्वतयारी व स्वागत

ऋतुराज वसंताच्या चाहुलीने निसर्गात प्रसन्नता यावी, कोकिळकूजनाने वातावरण भारले जावे आणि वृक्षराजीत नवचैतन्य बहरावे तद्वतच नव्या वर्षाचे वेध लागताच चिनी नागरिकांची पावले प्रसन्नतेची वाट चालू लागतात. घरे, कार्यालये स्वच्छतेचा वसा घेतल्यासारखी चमकू लागतात. साफसफाई -रंगरंगोटी यांची धामधूम उडते. कारण, नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसापूर्वी ही जुनी कामे संपविणे अपेक्षित असते. नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी व त्यापुढील चौदा दिवस 'निआन हुआ' (गुड लक) सर्वत्र प्रवेश करीत असते असे मानले जाते. नववर्षाच्या स्वागतप्रसंगी स्वच्छता केली तर आपले 'गुड लक'ही केरात जाईल, अशी त्यामागील भावना. सर्व स्वच्छता झाल्यानंतर सुऱ्या, कात्र्या हेही लांबच ठेवले जाते, न जाणो 'गुड लक'ला इजा झाली तर...! या वेळी आपापली जुनी देणी संपविण्याचा प्रघात आहे. तसेच नवीन केशरचना करण्याचेही महत्त्व आहे (कारण असे केल्याने संपूर्ण नवे वर्ष सुदैवी ठरते असा समज). कपडे आणि भेटवस्तू खरेदी करण्याचीही झुंबड उडते. जुने वर्ष संपायच्या सात दिवस आधी, गेल्या वर्षभरातील कौटुंबिक घडामोडी या देवांच्या राजाला (Jade) सांगण्यासाठी स्वयंपाकघरातील देव (किचन गॉड) हा घर सोडून जातो, असा समज आहे. म्हणून त्याच्यासाठी विशेष पाककृती तयार करण्यात येतात.

घराची सजावट हा तिथे विशेष जिव्हाळ्याचा विषय. लाल व सोनेरी रंगांच्या सजावटीत भर पडते ती 'निआन हुआ' (गुड लक) लिहिलेल्या भित्तीपत्रकांची. या

सजावटीत काही विशिष्ट झाडे, पाने-फुले यांना महत्त्व येते ते त्यामागे असलेल्या 'गुड लक'च्या भावनेपोटी. 'गुड लक'च्या कविताही पानोपानी बहरतात. या वासंतिक कविता नेहमीच 'लाल' कागदावर व 'जुळ्या'च असतात. या सजावटीपासून 'किचन' व 'डायनिंग टेबल'ही दूर नसते. त्याच्या मध्यभागी लाल -नारिंगी संत्र्यांचा पिरॅमिड रचणे हे आकर्षक दिसते आणि तो 'गुड लक' आणतो ! अशी सगळी तयारी करीत असताना सरत्या वर्षाची शेवटची रात्र येऊन ठेपते. या रात्रीच्या स्वागताची तयारी संध्याकाळपासूनच चालू होते. संध्यासमयी आपापल्या घरांच्या दारे-खिडक्या लाल-सोनेरी रंगाच्या कागदांनी सजवायच्या, सर्वांनी स्नान करायचे (कारण नववर्षाच्या सकाळी स्नान केले तर 'गुड लक' धुतले जाण्याची भीती !), नातेवाईकांनी एकत्र यायचे, मस्त जेवण करायचे आणि रात्रभर जागायचे. घरातील लहान मुले जेवढी जास्त जागतील, तेवढे घरातील ज्येष्ठांचे आयुष्य वाढते असाही समज प्रचलित आहे. मग दुष्ट प्रवृत्तींना घालविण्यासाठी भरपूर फटाके वाजवायचे आणि वर्षाच्या अखेरीस सोडून गेलेल्या 'किचन गॉड'ला घरी परतायचे निमंत्रण द्यायचे, असा सगळा कार्यक्रम या रात्री पार पडतो.

दुसऱ्या दिवशी नवे वर्ष चालू झालेले असते. नव्या वर्षाच्या पहिल्या पंधरा दिवसांत भरगच्च कार्यक्रम असतात. तसे बरेचसे कार्यालयीन व्यवहार या काळात थंडावलेले असतात. पहिल्या दिवशी स्वर्गातील व पृथ्वीवरील देवदेवतांचे स्वागत

### चिनी उकडीचे मोदक (युआनक्झिओ) !

*नववर्षाच्या या उत्सवात चीनमध्ये अनेक पारंपरिक पदार्थ तयार करण्यात येत असले तरी सर्वात जास्त महत्त्व मिळविले आहे ते 'युआनक्झिओ' - एक प्रकारचा चिनी उकडीचा मोदक - या पदार्थाने. विशेषतः, नववर्ष उत्सवातील शेवटच्या दिवशी याचे महत्त्व अधिक आहे. तांदुळाच्या पिठाचे आवरण असलेल्या या पदार्थाची पाककृती साधारणपणे महाराष्ट्रातील उकडीच्या मोदकासारखी आहे. तांदुळाचे पीठ पाण्यात भिजवायचे, त्याचे छोटे गोळे तयार करून त्यात सारण भरण्यासाठी खोलगट जागा करायची. यात भरावयाचे सारण मात्र गोड वा तिखट अशा दोन्ही चवीचे असू शकते. गोड सारण शाकाहारी व तिखट सारण मांसाहारी अशी ढोबळ विभागणी. गोड सारणात गुलाबाच्या पाकळ्या, साखर, अक्रोड, बीन पेस्ट असे काही घटकपदार्थ असतात. तर तिखट सारणात मांस व काही भाज्या असतात. 'युआन' हा चिनी नववर्षाचा पहिला महिना तर जुन्या काळात रात्रीला म्हणत असत 'क्झिओ'. म्हणून याचे नाव 'युआनक्झिओ'.*

(या दिवशी मांसाहार टाळतात), दुसऱ्या दिवशी आपल्या पूर्वजांचे स्मरण, तर तिसरा व चौथा दिवस जावयांनी आपल्या सासुरवाडीप्रती आदर दर्शविण्याचा असतो. संपत्तीच्या देवाची आराधना व स्वागत करायचे पाचव्या दिवशी. या वेळी सर्वांनी घरीच थांबायचे असते. सुहृदांच्या भेटीगाठीचे-जेवणावळींचे दिवस असतात सहावा, दहावा, अकरावा व बारावा. धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांप्रती आदर व्यक्त करायचा सातव्या दिवशी तर आठव्या दिवशी जपायची असते कौटुंबिक एकी. या काळात ज्येष्ठांनी मुलाबाळांना, तरुण-तरुणींना विविध प्रकारच्या भेटी, रोख रक्कम देण्याचा प्रघात आहे. या भेटींना फार महत्त्व दिले जाते कारण या भेटीही 'गुड लक' आणतात. या भेटी देण्यासाठी पाकिट असते ते 'लाल' रंगाचेच. नवव्या दिवशी देवांचा देव असलेल्या जेड राजाचे स्वागत करायचे. या सर्व दिवसांत भरपूर अन्न शिजवायचे व खायचेही असते ते भरभराटीची संकल्पना उराशी धरून. असा भरगच्च व भरपेट कार्यक्रम झाल्यानंतर तेरावा दिवस एकदम कमी खाण्याचा (पोटाच्या विश्रांतीसाठी) असतो.

**आकाशकंदील महोत्सव**

नववर्षाचा अखेरीचा टप्पा असतो आकाशकंदील महोत्सवाचा. त्यामुळे चौदावा दिवस याची तयारी करण्याचा असतो. या महोत्सवाबाबतही गंमतशीर आख्यायिका आहेत. एके दिवशी एका गावी, देवाधिदेव जेड यांच्या प्रिय बदकाची हत्या झाली. ही वार्ता समजताच देवाधिदेव संतप्त झाले व त्या गावाला शिक्षा करण्यासाठी ते गाव आगीत भस्मसात करण्याचे त्यांनी ठरविले. हा निर्णय एका सहृदयी परीला समजला व तिने गाव वाचविण्याची युक्ती केली. गावातील सर्व घरांमध्ये आकाशकंदील लावण्यात यावेत म्हणजे आकाशातून पाहताना सर्वत्र आग लागली असल्याचे दिसेल, असे तिने सुचविले. गावकऱ्यांनी तिचे ऐकले. त्या गावातील आकाशकंदील पाहून स्वर्गात बसलेल्या जेड राजाला असे वाटले की गावात खरोखरच आग लागली आहे. मग त्या गावाला आपोआप शिक्षा मिळाली, असे समजून राजाने गाव भस्मसात करण्याचा निर्णय माघारी घेतला. एका मोठ्या संकटातून गावाची सुटका झाली. तेव्हापासून नववर्षातील पहिल्या पौर्णिमेला घराघरांमध्ये आकाशकंदील टांगले जातात.

दुसरी कथा अशी सांगितली जाते की स्वर्गातील ताइयी (Taiyi) या देवाच्या हाती मानवाचे भवितव्य असून दुष्काळ, उपासमार, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींचे नियंत्रणही तो करीत असतो. चीनमधील नागरिकांना एकत्र करणारा पहिला राजा क्विनशिहुआंग याने सर्व नागरिकांसह या देवाची प्रार्थना करण्याबाबत पुढाकार घेतला.

त्यानंतर हॅन राजघराण्याने (इसवीसन पूर्व १०४) हा सर्वात महत्त्वाचा उत्सव असून तो रात्रभर साजरा करण्यात यावा, असे जाहीर केले. हा उत्सव ताओइझमशी संबंधित आहे हे या मागील तिसरे कारण. तियानग्वान ही ताओइझममधील 'गुड लक'ची देवता असून तिचा जन्मदिवस चांद्रमासातील पहिल्या पौर्णिमेला येतो. या देवतेला सर्व प्रकारचे मनोरंजन खूप आवडते. म्हणून 'गुड लक'साठी या देवतेची प्रार्थना करण्यात येऊन विविध प्रकारच्या मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

आणखी एक आख्यायिका बुद्धधर्माशी संबंधित आहे. हॅन राजघराण्यातील मिंगदी राजाच्या कारकिर्दीत (इसवीसनाचे पहिले शतक) चीनमध्ये बुद्धधर्माचा प्रसार झाला. पण तेव्हा जनमानसावर त्याचा फारसा परिणाम झाला नाही. दरम्यान, मिंगदी राजाने बुद्धाची मूर्ती स्थापन करण्यासाठी एक मंदिर व धर्मग्रंथ सुरक्षित ठेवण्यासाठी ग्रंथालय बांधले. त्या वेळी, गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानात अंधार दूर करण्याची शक्ती आहे, असे बौद्ध धर्माच्या अनुयायांना वाटले. त्यामुळे मिंगदी राजाने (अज्ञानाच्या ?) अंधाराचा नाश करण्यासाठी सर्व नागरिकांना आकाशकंदील लावण्यास सांगितले. तेव्हापासून आकाशकंदील महोत्सवाची सुरुवात झाली.

काळ बदलला तरी या उत्सवाचे स्वरूप फारसे बदललेले नाही. मात्र नवीन तंत्राने त्यात अधिक आकर्षकता नक्कीच आली. आता विविध प्राण्यांच्या आकाराचे, रंगीबेरंगी आकाशकंदील विक्रीसाठी येऊ लागले आहेत. आकाशकंदील तयार करण्याच्या स्पर्धाही कुठे कुठे आयोजित करण्यात येत आहेत. तैपेइ येथील अशी स्पर्धा प्रसिद्ध झाली आहे. नववर्षाच्या उत्सवाच्या शेवटच्या म्हणजे पंधराव्या दिवशी दुष्ट प्रवृत्तींना पळवून लावण्यासाठी आकाशकंदिलांच्या मिरवणुकाही काढण्यात येतात. शेवटच्या दिवशीचे मुख्य आकर्षण असते ते 'गोल्डन ड्रॅगन परेड'चे. ड्रॅगन हा शक्ती व चांगुलपणा यांचे प्रतीक आहे. नव्या वर्षात सर्वांना सुख-समाधान, शांती व 'गुड लक' लाभावे म्हणूनही ड्रॅगनची मिरवणूक काढण्यात येते. या वेळी मोठ्या प्रमाणावर फटाके वाजविण्यात येतात. तसेच नवे वर्ष ज्या प्राण्याचे असेल त्याची चित्रेही मिरवणुकीत अग्रभागी असतात. नृत्य व एरोबिक्स हाही मिरवणुकीचा भाग. अशी मिरवणूक पाहण्यासाठी लहान-थोरांच्या गर्दीने रस्ते फुलून गेले असतात.

रात्र सरते आणि मनामनांतील आनंदाचा, ओसंडणाऱ्या उत्साहाचा, सळसळत्या चैतन्याचा, सुहृदांच्या भेटण्याचा, आकर्षक भेटींचा, बहुढंगी फटाक्यांचा व बहुरंगी आकाशकंदिलांचा - उत्सव प्रकाशाचा - संपतो, पुढच्या वर्षी येण्यासाठी ! ✿✿

# तरंगता दीपोत्सव

या नभाने या भुईला दान द्यावे ।
आणि या मातीतूनी चैतन्य गावे ।।

कृषिसंस्कृतीशी असलेले मानवाचे नाते हे चिरंतन खरेच, मग ती भूमी भारताची असो की थायलंडची. या नात्याची वीण अधिक घट्ट होते ती संस्कृतीने. ही वीण घट्ट करणारा थायलंडचा सांस्कृतिक सण आहे *'लोइ क्रॅतोंग'* - *'तरंगता दीपोत्सव'*. 'लोइ' म्हणजे 'तरंगणारा' आणि 'क्रॅतोंग' म्हणजे एक 'विशिष्ट प्रकारचा दिवा'. नभाने अमृतवर्षावाचे दान दिलेल्या भूमीवर अंकूरलेल्या पानाफुलांच्या टोपलीत अतिशय आकर्षक पद्धतीने सजविलेला. थायलंडमधील गावोगावच्या संथ वाहणाऱ्या कृष्णामाईत सोडलेले असे असंख्य दिवे पाहणे हा आनंद आगळाच. 'आगळाच' म्हणायचे अशासाठी की हा दीपोत्सव केवळ शोभेसाठी नव्हे, तर, मनात कृतज्ञतेचा भाव जागविण्यासाठी असतो. 'वरूणराजाची कृपा झाली आता पीक-पाण्याचा प्रश्न सुटला', असे म्हणत वरूणराजाचे आभार मानण्यासाठी असतो. तसेच 'यंदा कुठे अवकृपा केली असशील, तर पुढील वर्षी तसे न करता वेळवर व नेटका ये रे' अशी विनवणी करण्यासाठीही असतो. 'नदीच्या प्रवाहात दिवे सोडण्याचा' अर्थ 'माणसाच्या हातून जाणता-अजाणता झालेले दुष्कृत्य (पाप) धुणे' आणि 'दुःख व दुर्दैव प्रवाहात वाहून जाऊ देणे', असाही घेतला जातो. गावात नदी नसेल तर कालवे, तळी यांमध्येही हे दिवे सोडण्यात येतात. दुःख वाहून गेल्यामुळे हा उत्सव आनंदाचा असतो. म्हणून या प्रसंगी 'नवे मागणे'ही असतेच.

जलदेवता मानणाऱ्या हिंदू संस्कृतीद्वारे हा प्रकाशाचा उत्सव थायलंड, कंबोडिया, चीनचा दक्षिण प्रांत आणि लाओस येथे पोहचला असावा, असे म्हटले जाते. मात्र, पौर्णिमेला साजरा करण्यात येणारा हा सण धार्मिक नसून त्याचे मूळ निसर्गातील सर्व घटनांमध्ये, प्राणीमात्रांमध्ये एक निसर्गतत्त्व आहे या श्रद्धेत आहे, असे मानले जाते. त्यामुळे थायलंडमधील छोटेसे गाव असो वा शहर, या उत्सवाचे चैतन्य आणि निसर्गाप्रती

मनांत असलेले औत्सुक्य यांमुळे तेथील जनमानस वेगळ्या भावनेने भारलेले असते. त्यातच भर पडते ती आल्हाददायक वातावरणाची. पावसाळा नुकताच संपलेला असतो. स्वच्छ निळे आकाश आणि हरिततृणांचे मखमली गालिचे घराबाहेर पडायला खुणावत असतात. रंगीबेरंगी पाने-फुलेही हाच मोह जागवित असतात. वातावरणात गारवा असतो पण उष्मा वा थंडी नसते. पावसाळ्यातील ढगाळ हवामानामुळे दुर्मिळ झालेले टिपूर चांदणे मनाला उल्हसित करीत असते. अशा वेळी लोइ क्रॅतोंगसारखे सण साजरे करणे हे अधिकच आनंददायी ठरते. लोइ क्रॅतोंग तयार करण्याची एक खास शैली आहे. बांबूच्या झाडाच्या कापलेल्या भागावर केळीची पाने गुंडाळायची, मग त्याचा आकार कमळाच्या पानासारखा दिसतो. त्यावर फुलांची सजावट करायची, मेणबत्ती व उदबत्ती लावायची की झाला तयार आकर्षक लोइ क्रॅतोंग. आणखीही कलाकुसर करून त्यात सौंदर्य आणता येते. थोडीशी वाळू आणि 'गुड लक' देणारे ताईतही त्यावर ठेवण्यात येतात. काही ठिकाणी नाणी ठेवण्याचाही प्रघात आहे. आपल्या छोट्याशा डब्यात अशी नाणी जमविणाऱ्या बालचमूचा यात पुढाकार असतो.

चांद्रमासाप्रमाणे येणाऱ्या बाराव्या पौर्णिमेला या उत्सवाची सुरुवात होते. तीन दिवस हा उत्सव चालू असतो. *या वर्षी, २००६ मध्ये, हा उत्सव ३ ते ५ नोव्हेंबर या काळात साजरा करण्यात येणार आहे.* पहिल्या रात्रीचा कार्यक्रम असतो क्रॅतोंग प्रवाहात सोडण्याचा. रंगीत व आकर्षक क्रॅतोंग हाती घेऊन तो सोडण्याचे कुतूहल मनी दाटलेल्या आबालवृद्धांच्या गर्दीने नदीकाठ गजबजतो. तरंगते दीप प्रवाहात हेलकावे खात असताना 'नवे मागणे' ओठी असणारे नागरिकही वेगळ्या भावविश्वातील हिंदोळ्यावर झुलत असतात. मग आपला क्रॅतोंग नजरेच्या टप्प्याआड होईतो पाण्यापासून दूर न जाण्याची प्रथा आपोआप पाळली जाते.

या उत्सवाची आणखी एक वेगळीच मजा आहे. क्रॅतोंग तयार करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले जातात कारण युवतींच्या कलाकुसरीची ही स्पर्धाही असते. यास कारणीभूत आहे ती सुमारे ७०० वर्षांपूर्वी सुखोताई राजघराण्याच्या काळात घडलेली एक घटना. त्या काळी पहिला क्रॅतोंग तयार केला नांग नोपामा या सुंदर युवतीने. नोपामाला जणू कारागिरीचे वरदानच मिळाले होते. अनेकांनी तिच्या कलाकुसरीची नक्कल केली. तेव्हा राजाने क्रॅतोंग तयार करण्याची स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेत अर्थातच नोपामाला पुरस्कार मिळाला. त्यानंतर राजाने असेही ठरविले की दरवर्षी अशी स्पर्धा घेतली जावी व हा दिवस निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस

समजण्यात यावा. तेव्हापासून क्रॅतोंग तयार करण्याची स्पर्धा घेण्याची पद्धत रूढावली. पुरस्कारप्राप्त युवतीला 'सौंदर्यवती' म्हटले जाते. 'बोक फाइ' नावाचे परंपरागत बाण आकाशात सोडणे हाही या उत्सवाचा एक महत्त्वाचा भाग असतो.

यापूर्वी, फार जुन्या काळात तेथे आकाशकंदिलांच्या महोत्सवही प्रचलित होता. त्या काळात, 'प्र आइ-सुआन', 'प्र नारइ' आणि 'प्र प्रॉम' अशा तीन वेगवेगळ्या देवतांचे पूजन केले जात होते. तेव्हा प्राण्यांच्या चरबीपासून वा मेणापासून तयार केलेल्या मेणबत्त्या कंदिलासाठी वापरल्या जात. या मेणबत्त्या असणारे आकाशकंदील या तीन देवांना अर्पण केले जात. राजे, श्रीमंत व्यक्ती व ज्येष्ठ अधिकारी यांनाही आकाशकंदील भेट देण्यात येत. आकाशकंदील घराबाहेर लावण्याचीही प्रथा आहे. कधी कधी आकाशकंदिलांमध्ये तेलाचे दिवेही असत. 'लोइ क्रॅतोंग' उत्सवाच्या काळाला 'यी पेंग' असेही म्हटले जाते. या काळात बौद्ध धर्माचाही एक उत्सव असतो. त्याला 'तांग थॅम लुआंग' म्हणतात. या वेळी घरे व मंदिरे सुशोभित करण्यात येतात. आकाशकंदील हाती घेऊन बौद्ध धर्मानुयायी गावात फेरीही मारतात तसेच घरोघरी, मंदिरात, विहारांत सर्वत्र आकाशकंदील लावण्यात येतात. बौद्ध धर्म - परंपरेनुसार विविध आकाराचे (उदाहरणार्थ, चक्र, चांदणी, कमळ इत्यादी) आकाशकंदील असतात. 'कोम लोइ' नामक आकाशकंदील आकाशात सोडायचा असतो. त्यासाठी हवा गरम होऊन त्याद्वारे कंदील आकाशात जाईल, अशी विशिष्ट रचनाही केलेली असते. व्यक्तीचे दुष्कर्म व दुर्दैव वाऱ्याबरोबर दूर घालविणे अशी यामागील भावना. अशा काही आकाशकंदिलांमध्ये पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता असतो. जर हा कंदील कोणाला सापडला तर ती व्यक्ती पाठविणाऱ्याकडून काही पैसे घेऊ शकते, अशीही एक प्रथा आहे. तर फार पूर्वी, युद्धाच्या काळात अशा कंदिलांच्या मदतीने शत्रुसैन्यात स्फोटही घडवून आणले जात. 'कोम पाड' या नावाचा आकाशकंदील आपल्या अक्षाभोवती फिरणारा असा असतो. या काळात घरांच्या भिंतींवर मातीचे दिवे म्हणजे 'फांग पटीट' (पणत्या) लावण्यात येतात. घरातील सर्व कुटुंबियांच्या वयाची एकत्रित बेरीज जेवढी होते, तेवढ्या पणत्या म्हणजे 'फांग पटीट' लावणे अपेक्षित असते.

या तीन दिवसांत मनोरंजनाचे भरपूर कार्यक्रम असतात. कुठे तराफ्यांच्या तर कुठे नावांच्या (बोटींच्या) शर्यती आयोजिलेल्या असतात. तीनही दिवशी मोठ्या प्रमाणात फटाके वाजविण्यात येतात. आल्हाददायक वातावरणात, आनंद देणारा 'तरंगता दीपोत्सव' अनुभवणे हे तेथील पर्यटनाचे एक खास आकर्षणही आहे.

उत्सव प्रकाशाचा
इस्रायल

# वीरश्रीच्या आठवणीत.....

क्रिकेटचा एखादा सामना संस्मरणीय झाला की त्या सामन्यातील स्टंप्स वा बॅट आपल्या संग्रही ठेवणारे खेळाडू आपल्याला माहिती आहेत. खरे तर अशा आठवणी या खेळाडूंच्या मनःपटलावर कोरल्या गेल्या असतात. स्टंप हे केवळ निमित्तमात्र असते. पण खेळाच्या इतिहासात अशा स्टंप्स वा बॅटचे महत्त्व असतेच. मागे वळून पाहताना अशा रोमांचकारी क्षणांची आठवण, ही स्टंप वा बॅट ताजी करीत असतात, उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणाही देत असतात.

इतिहासातील रोमांचकारी प्रसंगाची आठवण करून देणारा व प्रेरणा देणारा इस्रायलमधील वीरश्रीचा दीपोत्सव याच प्रकारातील. छळाकडून बळाकडे गेलेल्या इस्रायलचा हा दीपोत्सव धार्मिक वा सांस्कृतिक नाही, तर त्याचा संदर्भ आहे लष्करी व राजकीय. त्यात तेलाचा संदर्भ असला तरी मध्य आशियातील तेलसाठे, तेलाचे राजकारण, तेलावरून झालेली युद्धे असा हा संबंध नाही. अलीकडच्या काळात, तेलासाठी झालेल्या युद्धांचा जसा एक इतिहास आहे त्याचप्रमाणे इतिहासकाळातील युद्धे, त्यात मिळालेला विजय आणि त्याचा तेलाशी असणारा संबंध यांचाही एक छोटासा इतिहास आहे. युद्धाचा, तेलाचा आणि या दीपोत्सवाचा इतिहासातील परस्परसंबंध दर्शविणारी ही एक वेगळीच कहाणी आहे.

ख्रिस्तपूर्व काळ. जगज्जेता 'अलेक्झांडर द ग्रेट'च्या पराक्रमांनी गाजलेला काळ. जगज्जेत्याच्या निधनानंतरही युद्धांना विराम न मिळाल्याचा काळ. अशा काळात सीरियातील ग्रीकांचे ज्यू वंशियांशी (मॅकॅबी गट) युद्ध चालू झालेले. जगातील त्या काळचे सर्वशक्तिमान सैन्य समोर उभे ठाकले असतानाही विजयमाला गळ्यात पडली ती ज्यू वंशियांच्या. ग्रीकांनी ताबा मिळविलेले ज्यूंचे मंदिर या विजयानंतर त्यांना परत मिळविता आले. हे मंदिर म्हणजे ज्यू वंशियांचे पवित्र स्थान होते. ते भ्रष्ट करून तेथे पेगन (pagan) संस्कृती आणण्याचा प्रयत्न ग्रीकांनी केला होता. त्या काळातील एक मूर्ती ठेवून तेथे बळीदेखील देण्यात आले होते. मॅकबींनी ते मंदिर स्वच्छ केले. मग ग्रीकांच्या बलाढ्य सेनेबरोबर झालेल्या ज्यूंच्या संघर्षाची रोमहर्षक कहाणी,त्यात मिळालेला विजय व धर्मस्वातंत्र्याची प्राप्ती साजरी करण्यासाठी तेथे उत्सव (हीब्रू भाषेत हनुख)

करण्यात आला (हनुखचा उल्लेख 'चानुख' असाही करण्यात आला आहे). धर्माची व देशाची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करण्यात आली. हनुखसाठी पूर्वीच्या परंपरेप्रमाणे मंदिरात दिवे लावण्याच्या वेळी असे लक्षात आले की दिवे लावायच्या विशिष्ट मनोऱ्यात - हनुकीहमध्ये - (स्टँडमध्ये) केवळ एका रात्रीसाठी कसेबसे पुरेल एवढेच तेल शिल्लक आहे. पण तरी दिवा लावण्यात आला आणि गंमत म्हणजे तेवढ्याशा त्या मोजक्या तेलावर हा दिवा चक्क आठ दिवस तेवत राहिला. या दरम्यान आठ दिवसांत ज्यूंना तेल मिळविता आले. त्या काळी '*तेलाची करामत*' म्हणून ही कहाणी प्रसिद्ध झाली.

युद्धानंतरच्या विजयाचे संस्मरण करणाऱ्या हनुख या दीपोत्सवाची ही खरी सुरुवात. या संदर्भात असाही समज आहे की विजयानंतर तेथे दिव्यांची एक मिरवणूक काढण्यात आली होती म्हणूनही हा दीपोत्सव साजरा करण्यात येतो. या घटनेनंतर मॅकबींचे राज्य स्थापन झाले. त्यांनी नाणीही वापरण्यास प्रारंभ केला (अमेरिकी लेखक हॉवर्ड फास्ट यांनी इतिहासातील ही घटना - इस्रायलच्या मुक्तीची गाथा - 'माय ग्लोरियस ब्रदर्स' या कादंबरीद्वारे पुढे आणली आहे). रोमन इतिहासकारांनी मॅकबींचा उल्लेख करताना त्यांना 'रोमन नागरिकांचे व रोमन सिनेटचे मित्र' असे संबोधले आहे.

हनुख हा दीपोत्सव सलग आठ दिवस दिवे लावून साजरा केला जातो. ज्यूंच्या कॅलेंडरनुसार किसलेव महिन्याच्या २५ व्या दिवशी (इंग्रजी कॅलेंडरनुसार नोव्हेंबर वा डिसेंबर महिन्यात) हनुख दीपोत्सवास प्रारंभ होतो. *इंग्रजी कॅलेंडरनुसार या वर्षी हा उत्सव १५ डिसेंबर ते २२ डिसेंबर या काळात होणार आहे.* हनुखसाठी दिवे लावण्याच्या हनुकीहमध्ये एकूण नऊ दिवे लावण्यासाठी जागा असते. आठ दिवसांचे आठ दिवे व हे आठ दिवे लावण्यासाठी मदतनीस असलेला नववा दिवा (शमश) असतो. हनुकीहमध्ये याचे स्थान मध्यवर्ती असते. पूर्वीच्या काळी हे दिवे तेलांचे असत. अलीकडच्या काळात मात्र तेलांच्या दिव्यांऐवजी मेणबत्त्या लावण्यात येतात. दररोज एक याप्रमाणे आठ दिवस हनुकीहमध्ये मेणबत्त्या लावण्यात येतात. मेणबत्त्या लावण्याची एक विशिष्ट पद्धत असते. त्यानुसार मदतनीस मेणबत्ती (शमश) प्रथम लावण्यात येते. तिच्या मदतीने पहिल्या दिवशी उजवीकडील मेणबत्ती प्रथम लावण्यात येते. मग दुसऱ्या दिवशी उजवीकडील दुसरी - अशा पद्धतीने आठ दिवस आठ मेणबत्त्या लावण्यात येतात. या काळात घराघरांमध्ये दैनंदिन प्रार्थनेशिवाय काही धार्मिक विधी

करण्यात येतात. पहिल्या दिवशी मेणबत्त्या लावण्याआधी आशीर्वादासाठी तीन विशिष्ट प्रार्थना म्हटल्या जातात. नंतरचे सात दिवस त्यापैकी दोन प्रार्थना म्हटल्या जातात. शमशच्या ज्योतीने दुसरी ज्योत प्रदीप्त केल्यानंतर पुन्हा एक प्रार्थना करून ईशस्त्रोत्र म्हटले जाते. हनुखला 'फेस्टिव्हल ऑफ लाइट्स्' असे म्हटले जाते आणि उत्तरेकडील देशांमध्ये थंडीतील सर्वात लहान दिवस दिवे लावून साजरा करण्याच्या प्रथेशी त्याचे साधर्म्य दर्शविले जाते. विशेषतः, ख्रिसमस, जुन्या काळातील रोमन नागरिकांचा 'सॅटर्नालिया आणि अमेरिकेतील आफ्रिकी नागरिक साजरा करतात तो 'क्वांझा' उत्सव हे सर्वसाधारणपणे एकाच कालावधीत साजरे केले जातात व एकाच गटात मोडलेही जातात. हनुखचा उल्लेख 'तालमड'मध्ये (Talmud - ज्यूंचा धार्मिक व कायदेशीर ग्रंथ) करण्यात आला असून तो 'धार्मिक सण' या प्रकारात गणण्यात आलेला नाही. तरीदेखील ज्यू वंशियांच्या परंपरेत मध्यवर्ती स्थान असलेला तो एक उत्सव मानला जातो. फार पूर्वीच्या काळी ज्यूंमधील फरयासी (Pharisees) गटाने या उत्सवाप्रती अनास्था दर्शविली होती. कारण, मॅकबी गटाने काही प्रमाणात ग्रीकांच्या संस्कृतीकडे (Hellenistic) कल दर्शविला होता आणि या उत्सवाची पार्श्वभूमी धार्मिक नसून ती लष्करी व राजकीय होती.

दरम्यान, इतिहासातील अनेक घडामोडींमुळे आपल्याच देशातून परागंदा झालेले व जगभरात विखुरलेले ज्यू नागरिक एकोणिसाव्या शतकात एकत्र येऊ लागले तेव्हा या उत्सव पुन्हा नव्या जोमाने साजरा करण्यात येऊ लागला. रशिया व पूर्व युरोपमध्ये स्थलांतरित झालेल्या ज्यूंनी हनुखचे समर्थन करून त्याला राष्ट्रमुक्तीचा लढा समजून त्या काळात सार्वजनिक सुटी जाहीर करावी असा आग्रह धरला. यामुळे ज्यू नागरिकांच्या भावी पिढ्यांत संस्कृतीबद्दलची आपुलकीची भावना व देशप्रेम वाढीस लागेल अशीही त्यांची अपेक्षा होती. शिवाय, परंपरेचे पालन कसोशीने न करणाऱ्या ज्यू नागरिकांमधील धर्मभावनाही याद्वारे वाढीस लागतील, असेही त्यांना वाटत होते. पूर्व युरोपमधील मुलांसाठी हनुखचे महत्त्व विशद करणारी एक कथाही शालोम अलेइकेम या लेखकाने लिहिली. ज्यूंच्या राष्ट्रवादी चळवळीत तर हनुखला महत्त्व मिळालेच. अलीकडच्या काळात अमेरिकेतील ज्यू वंशियांमध्ये हनुखलाही महत्त्व प्राप्त होत आहे.

हनुख हा विजयोत्सव असल्याने या उत्सवाला एक जोड आहे ती एका खेळाची. खेळाचे नाव आहे Dreidel. तेलाच्या कहाणीला अनुसरून या खेळातील शब्द आहेत NUN, GIMEL, HEY, SHIN. यांचा अर्थ आहे 'A Miracle

# क्वांझा

उत्सव प्रकाशाचा....आपापल्या संस्कृतीचा....कोरलेल्या आठवणींचा... मग उदरनिर्वाहासाठी आपल्या देशापासून, समाजापासून दूर गेलेल्या पावलांना ओढ लागते ती मायदेशी परतण्याची. पण दैनंदिन रहाटगाडग्यात अडकल्याने मायभूमीची धूळ मस्तकी लागतच नाही. मग वास्तव्याच्या ठिकाणीच आठवणी जागविण्यासाठी समान धाग्याने जुळलेली मने एकत्र येतात. काळाच्या ओघात मनामनांत एक नवीनच उत्सव सुरू होतो. असेच काहीसे घडले आहे अमेरिकेतील आफ्रिकी समाजाबाबत. या समाजातर्फे 'क्वांझा' असा उत्सव साजरा करण्यात येतो. मात्र हा उत्सव आहे अगदी अलीकडचा - १९६६ सालापासून चालू झालेला. डॉ. मौलाना कारेंगा यांनी अमेरिकेतील आफ्रिकी नागरिकांसाठी हा उत्सव चालू केला तो कापणीनंतरच्या पहिल्या धान्याचे स्वागत करण्यासाठी. तसेच ख्रिसमसमुळे येणाऱ्या व्यापारी संस्कृतीला प्रत्युत्तर देण्यासाठी ! आफ्रिकेतील स्वाहिली (केनिया, युगांडा, टांझानिया) भाषेत 'क्वांझा' म्हणजे 'पहिला'. या समाजाचे आफ्रिकेतील कृषिसंस्कृतीशी असलेले नाते दृढ करण्याचा हा एक प्रयत्न. खरे तर आफ्रिकींच्या या उत्सवाची पाळेमुळे आफ्रिकेत कुठेच नाहीत. पण अमेरिकेतील हा समाज एकत्र यावा या उद्देशाने हा उत्सव चालू झाला आणि फक्त अमेरिकेतीलच आफ्रिकी नागरिक तो साजरा करतात. या वेळी क्वांझाची तत्त्वे आचरणात आणण्यासाठी रोज एक याप्रमाणे सात दिवस मेणबत्त्या लावण्यात येतात. नातेवाईक, मित्रपरिवार एकत्र येतो, खाणेपिणे, गप्पाटप्पा होतात. जुन्या आठवणी जागविल्या जातात. त्याचबरोबर उमोझा (unity), स्वयंनिर्णय (self-determination), उजामा, निया (उद्दिष्ट - purpose), कुंबा (सृजनशीलता - creativity) आणि इमानी (श्रद्धा -belief) या तत्त्वांचे पालन करण्याची खूणगाठ बांधली जाते. समाजातील बालगोपाळांना भेटी दिल्या जातात (यातून पालकांची मुलांप्रती असलेली बांधिलकी अधिक घट्ट व्हावी अशी अपेक्षा असते). आफ्रिकेतील ध्वजात (flag) असलेल्या रंगांमध्ये या भेटी बांधल्या जातात. वर्षाच्या शेवटच्या दिवशी मेजवानीचे आयोजन करण्यात येते. असे असले तरी काहींच्या मते अमेरिकेतील आफ्रिकी समाजगटाने राजकीयदृष्ट्या एकत्र यावे हेच 'क्वांझा'चे उद्दिष्ट आहे.

Happened Here.' या खेळासाठी चार बाजू असलेला एक डबा असतो. त्याच्या चारही बाजूंना एक याप्रमाणे वरील चार शब्द लिहिलेले असतात. या डब्यात नाणी, चॉकलेट्स्, काजू -दाणे असे काहीही भरलेले असते. प्रत्येक खेळाडूने आपल्या क्रमांकानुसार हा डबा गोल फिरवायचा असतो. डबा फिरायचा थांबला की खेळाडूच्या समोर आलेल्या बाजूवर जो शब्द लिहिला असेल त्या प्रमाणे कृती करायची. उदाहरणार्थ

### *इस्रायली बटाटेवडा*

*हनुखचे एक वेगळेही महत्त्व आहे ते तेलकहाणीच्या पार्श्वभूमीमुळे. 'तेलाच्या करामती' मुळे तळणाचे पदार्थ हा या उत्सवाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. या पदार्थांमध्ये आघाडीवर आहेत तळलेले डोनट आणि पॅनकेक (पॅनकेक म्हणजे कांदा असलेला एक प्रकारचा इस्रायली बटाटेवडा). युरोपमधील ज्यूंना हा बटाटेवडा प्रिय आहे तर इस्रायलमधील ज्यूंना तळलेला डोनट. बटाटेवडा करण्यासाठी बटाटा व कांदा बारीक चिरून/ कुस्करून घ्यायचा. त्यात मीठ व लिंबाचा रस घालायचा. या मिश्रणात फेटलेले अंडे घालायचे , मग या मिश्रणाचे गोलसर वडे करायचे आणि ते थोड्या तेलात तळून ॲपल सॉसबरोबर खायचे. डोनट मात्र जास्त तेलात तळलेले असतात.*

- NUN लिहिलेली बाजू खेळाडूच्या समोर आली तर 'काहीच करायचे नाही, तुमची संधी हुकली' असा अर्थ होतो. मग दुसऱ्या खेळाडूने खेळायचे. अशा प्रकारे खेळ पुढे सरकतो. डब्यावर GIMEL आले म्हणजे 'खेळाडू जिंकला, जिंकलेल्या खेळाडूने डब्यातील सर्व काही घ्यायचे'. HEY म्हणजे 'खेळाडूची थोडीशी जीत म्हणून त्याने डब्यातील अर्धा खाऊ वा नाणी घ्यायची' तर SHIN म्हणजे 'खेळाडूची हार म्हणून त्याने दंडापोटी डब्यात भर घालायची', असा हा खेळ.

रंजक तेलकहाणीने समृद्ध असलेला असा हा विजयोत्सव हनुख ! छळाकडून बळाकडे गेलेल्या इस्रायलला आजही जेतेपदाची आठवण करून देणारा तसेच जिंकण्याची प्रेरणा देणारा !

✿✿

# प्रकाशाची राणी

आकाशात शुक्र तारा...मंद वाहणारा वारा... डिसेंबर महिना असल्याने बाहेर अद्याप अंधाराचेच साम्राज्य...थंडीमुळे जग अजूनही गाढ झोपेतच....पाऊल न वाजविता हळूच एका तरुणीचा खोलीत प्रवेश...अंगात पांढराशुभ्र पायघोळ घेरदार झगा, त्यावर लाल कंबरपट्टा, मस्तकी झुंबराचा मुकुट (chandelier) व हातात वाफाळत्या कॉफीचा ट्रे. त्याबरोबर आलं घातलेली बिस्किटे व केशरयुक्त ब्रेड...उठण्याची विनंती करणारा गोड आवाज.. स्वप्न नाही हे ! ही तर आहे प्रकाशाची राणी - सान्ता लुसिया.

स्वीडन, नॉर्वे आणि फिनलंड या स्कॅन्डिनेव्हियन देशांमधे १३ डिसेंबरला 'फेस्टिव्हल ऑफ लाइट्स्' साजरा करतात. त्या वेळी घराघरांतील तरुणींनी, मुलींनी अशी सान्ता लुसियाची वेशभूषा करून घरातील सर्वांना भल्या पहाटे (साधारणतः ३-४ वाजता) जागे करायचे असते. डिसेंबर महिन्यात दिवस लहान, दर दिवशी अंधाराचे तास जास्त असताना ही 'सान्ता लुसिया' प्रकाश व आशेची किरणे आणते, असा त्यामागे असणारा भाव. केवळ घराघरांतच नव्हे, तर रुग्णालयांत, कार्यालयांत, शाळांमध्ये त्या दिवशी असा कार्यक्रम होतो. २५ डिसेंबर रोजी येणाऱ्या ख्रिसमसच्या तयारीची ही सुरुवातच असते. गावागावांमधील नागरिक आपल्या गावातील एका तरुणीची 'सान्ता लुसिया' म्हणून निवड करतात. मग तिची एक छानशी मिरवणूकही काढतात. या वेळी गावातील इतर तरुण-तरुणींचा ताफा तिच्या मागे असतो. ताफ्यातील तरुणींची वेशभूषा तिच्यासारखीच असते तर, तरुणांच्या डोक्यावर चांदण्यांनी मढलेल्या टोप्या असतात. हा ताफा सर्व नागरिकांना कॉफी, केशरयुक्त ब्रेड आणि आल्याची बिस्किटे वाटत गावभर हिंडतो. आल्याची बिस्किटे ही खास या सणासाठी तयार केलेली असतात.

भर थंडीत, भल्या पहाटे, काव्यभाव मनी जागविणारी सान्ता लुसिया ही केवळ कविकल्पना नाही ती एक हकीकत आहे(*). फार पूर्वी रोमन साम्राज्याच्या काळात

*अशोककुमार व मधुबाला यांच्या गाजलेल्या 'महल' सिनेमातील एक उत्कंठावर्धक दृष्य आठवा. मस्तकावरील मुकुट वगळता सान्ता लुसियाशी साधर्म्य साधणारी मधुबालाची वेशभूषा....अशोककुमारला मधुबाला दिसणे हा 'भास' असल्याचे त्याच्या मित्राचे मत... एवढ्यात ते संभाषण लपून ऐकणारी मधुबाला म्हणते, 'मै वहम नहीं, हकीकत हूँ।'

ख्रिस्ती धर्मासाठी बलिदान केलेली व संतपदाला पोहोचलेली ही युवती, इटलीतील सिसिली बेटावरील सिरॅकस या गावची. रोमन साम्राज्याला उतरती कळा लागली असताना व ख्रिस्ती धर्माचा प्रसार होत असताना इसवीसन ३०४ मध्ये, १३ डिसेंबर रोजी तिचा शिरच्छेद करण्यात आला. ख्रिस्ती धर्मासाठी बलिदान केलेल्या सान्ता लुसियाच्या स्मृतीप्रीत्यर्थ इटलीच्या उत्तर भागांतील व्हेनिस येथे चर्च बांधण्यात आले आहे. 'लुसिया' याचा अर्थ 'लाइट्' असा असल्याने सान्ता लुसियाच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'फेस्टिव्हल ऑफ लाइट्स्' साजरा करण्यात येतो, असे म्हणतात.

त्या काळी, नॉर्वेत १३ डिसेंबर हा सर्वात लहान दिवस मानला जाई. तेव्हा लोकांना भूत-पिशाच्चांची भीती वाटत असे. दिवस लहान व रात्र मोठी आणि थंडीचा कडाकाही असायचा. दुसऱ्या दिवसापासून सूर्याचा प्रभाव हळूहळू वाढणार व त्याबरोबर दिवसही मोठा होणार म्हणून आनंद व्यक्त करण्यासाठी रात्री (आणि बहुधा भूतांना पळवून लावण्यासाठीही !) शेकोट्या पेटविण्यात येत असत. नॉर्वेतील नागरिकांनी (Norse) आपल्या इतर श्रद्धा व विश्वास (Pagan) सोडून इसवीसन १००० मध्ये ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. थंडीतील सर्वात लहान दिवस व सान्ता लुसियाशी संबंधित असलेला 'फेस्टिव्हल ऑफ लाइट्स्' हा एकाच दिवशी - १३ डिसेंबर रोजी येत असल्याने त्या काळी ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या व न स्वीकारलेल्या अशा दोन्ही गटांतील नागरिकांनी हा प्रकाशोत्सव साजरा करण्याचे ठरविले. आणखी एका कहाणीप्रमाणे या दिवसापूर्वी शेतातील कापणी पूर्ण होण्यासाठी रात्रभर काम करावे लागायचे व त्यासाठी काम करणाऱ्यांना 'ब्रँडी' किंवा तत्सम पेय (कप ऑफ लाइट्) दिले जाई. 'लुसी' म्हणजे 'लाइट्' या अर्थाने हा संबंध दिसतो, असे म्हटले जाते.

काहींच्या मते ही पद्धत १६ व्या शतकात जर्मनीकडून आयात केली गेली. पहिली लुसिया ही पांढरा कोट घातलेली व हाती मेणबत्ती असलेली होती. ती लहान मुलांबरोबर घरोघरी जायची. तेव्हा गाणी-गप्पा-विनोद व खाणेपिणे व्हायचे. स्वीडनमधील श्रीमंत घरांमध्ये हा उत्सव प्रथम साजरा करण्यात आला असावा, असाही अंदाज आहे. फार पूर्वी स्वीडनमध्ये पडलेल्या दुष्काळाचा संबंध या उत्सवाशी जोडण्यात आला आहे. थंडीत पडलेल्या या दुष्काळाच्या वेळी लोकांनी चर्चमध्ये जाऊन प्रार्थना केली तेव्हा ईश्वराने जहाजभर गहू पाठविले ते अतिशय तेजस्वी असणाऱ्या सान्ता लुसियामार्फत. उत्सवामागे गोष्ट कोणतीही असली तरी भर थंडीत, एका पहाटे 'प्रकाशाच्या राणी'ने उठविणे हे आल्हाददायक खरे !

# शताब्दी एका 'मिशन' ची

'व्यक्ती' आणि 'संस्था' यांच्या जीवनक्रमात एक अतिशय मूलभूत फरक असतो. व्यक्तीचे आयुष्य मोजके असते तर, संस्था या अमर असतात. एखाद्या संस्थेची, तिच्या कार्याची, त्या संस्थेच्या स्थापनेस कारणभूत ठरलेल्या उद्देशांची, संस्थानिर्मितीमागील हेतूंची प्रस्तुतता बदलत्या काळाबरोबर संपुष्टात आली तर अशा संस्थांमधील प्राणतत्व लयाला जाते. परंतु, स्मृतिरूपाने त्या जिवंत राहतातच. काही संस्था अशाही असतात की ज्या उद्देशाने त्यांची स्थापना झालेली असते त्या उद्दिष्टांची प्रस्तुतता शाबूत असूनही अनेकविध कारणांपायी त्या क्रियाशून्य बनतात. अशा अनेक संस्थांचे सांगाडे आपण आजूबाजूला बघत असतो. त्या सांगाड्यांच्या रूपाने का होईना पण त्या संस्था आपले अस्तित्व जाणवून देत असतात. तर, काही संस्था अशा असतात की काळाच्या ओघात त्यांचे लोकमानसातील स्मरण पुसट होत जाते. इतिहासाच्या पुस्तकांमधील पानांवरच त्यांचे दर्शन छापील स्वरूपात घडते. मात्र, ज्या उद्देशाने त्या संस्थांची स्थापना झालेली असते त्या उद्दिष्टांची प्रस्तुतता अभंग असते. भूतकाळापेक्षाही वर्तमानात त्या उद्दिष्टांची, त्यांच्या पूर्ततेसाठी झटण्याची निकड अधिक तीव्रतेने जाणवू लागते. अशा वेळी मग त्या संस्थांच्या प्रवर्तकांची याद तीव्रतेने येते, त्यांच्या कार्याचे ऐतिहासिक महत्व प्रकर्षाने जाणवते, त्यांच्या ठायीच्या द्रष्टेपणाची ओळख नव्याने पटते आणि मग त्या कार्याची वाहक ठरलेल्या संस्थेच्या स्मृती विद्यमान काळातील समस्यांचा सामना करण्यासाठी प्रेरणादायक ठरतात. अशा संस्थांचे चिरंजीवित्व मग अशा माध्यमातून प्रतीत होते.

....अशाच एका संस्थेची शताब्दी १८ ऑक्टोबर २००६ रोजी साजरी होत आहे. पाहा आठवते का ? जरा स्मृतीला ताण द्या...ही संस्था म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेली 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' बरोबर १०० वर्षांपूर्वी, म्हणजे १८ ऑक्टोबर १९०६ रोजी, कार्तिक वद्य प्रतिपदेच्या दिवशी, मुंबईच्या एल्फिन्स्टन रोडनजिकच्या मुरारजी वालजी यांच्या बंगल्यात सकाळी नऊ वाजता मिशनची पहिली शाळा सुरू झाली. प्रार्थना समाजाचे तत्कालीन अध्यक्ष

सर नारायण गणेश चंदावरकर यांनी शाळेत दाखल झालेल्या मुलांना पहिला धडा घातला आणि विठ्ठल रामजींच्या प्रयत्नांमधून साकारलेल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीच्या कार्यास प्रारंभ झाला. 'भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी' हा, 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या इंग्रजी नावाचा मराठी अवतार. त्या आधी दोनच दिवस, म्हणजे, १६ ऑक्टोबर १९०६ रोजी प्रार्थना समाजाचे तत्कालीन उपाध्यक्ष शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांनी मिशनच्या स्थापनेसाठी एक हजार रुपयांची देणगी महर्षींच्या सुपूर्त केली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (२३ एप्रिल १८७३ - २ जानेवारी १९४४) यांनी स्थापन केलेली डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था आणि या संस्थेचे कार्य म्हणजे भारतीय समाजाच्या उतरंडपूर्ण जडणघडणीत तळाशी गाडल्या गेलेल्या दलित, (तथाकथित) अस्पृश्य समाजातील घटकांच्या सर्वांगीण उन्नयनाचे विलक्षण प्रेरणादायक असे पर्व आहे. जातिभेदाधारित उच्चनीचता आणि स्पृश्यास्पृश्यतेच्या भ्रामक कल्पनांविरुद्धचा प्रखर लढा, विठ्ठल रामजींच्या या क्षेत्रातील पदार्पणापूर्वीच जवळपास पाच दशके, म्हणजे १८५२ साली महात्मा जोतीबा फुले यांनी या वर्गांतील मुलांसाठी पुण्यात पहिली शाळा उघडून उभारला होता. जातिभेदाचे अधिष्ठान लाभलेल्या सामाजिक विषमतेविरुद्ध, त्या विषमतेमधून निपजणाऱ्या पिळवणूकीविरुद्ध समाजातील दलित वर्गांना संघटित करण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचे सबलीकरण करण्याचे प्रयत्न विठ्ठल रामजींच्या आधी एकूण तीन समाजमनस्कांनी केले. जोतीबा हे त्यांतील आद्य सुधारक. त्यानंतर, दलित समाजांच्या उन्नतीसाठी, अस्पृश्यता निवारणासाठी बंगालमध्ये १८६०च्या दशकाच्या मध्यास बाबू शशिपाद बॅनर्जी यांनी शिक्षणाच्या कार्यास हात घातला. त्यानंतर, जवळपास पाव शतकाने, म्हणजे १८८३ मध्ये बडोदानरेश श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांनी अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजघटकांमधील मुलांच्या शिक्षणासाठी मोफत शाळा सुरू केल्या. १८८४ साली अशा शाळांची असणारी अवघी सात ही संख्या १९१० साली २४७ वर, तर अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांची संख्या १४ हजारांवर पोहोचली.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीनेही दलित समजल्या गेलेल्या समाजसमूहांच्या उन्नयनासाठी शिक्षण प्रसाराचीच कास पकडली. मात्र, विठ्ठल रामजींच्या या उपक्रमाचे, तेव्हा प्रतीत झालेले आणि आजही तितकेच प्रस्तुत असणारे आगळे वैशिष्ट्य म्हणजे वर्गाच्या चार भिंतींमध्ये दिल्या जाणाऱ्या

औपचारिक पुस्तकी शिक्षणाला महर्षींनी आग्रही डोळसपणे पुरविलेली व्यावसायिक शिक्षणाची जोड ! जन्मजात उच्चनीचतेच्या भ्रामक समजूतींनुसार श्रमविभागणी घडून येऊन ज्या समाजव्यवस्थेत काही समाजघटकांना जातिनिविष्ट पारंपरिक, हीन व्यवसाय करणेच भाग पडते अशा वर्गांतील नवीन पिढ्यांना नवशिक्षण दिले तरी त्या शिक्षणाची नाळ उपजीविकेच्या नवसंधींशी जुळली जात नाही. परिणामतः, असे आधुनिक शिक्षण निष्फळ आणि नवशिक्षित उपेक्षितांच्या नैराश्यास कारणभूत ठरते, असे विठ्ठल रामजी शिंदे याचे अनुभवसिद्ध अनुमान होते. शालेय शिक्षणाच्या जोडीने, म्हणूनच, अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजघटकांमधील मुलामुलींसाठी व्यवसायशिक्षणाच्या संधी-सुविधा उपलब्ध करून देणे, औपचारिक शिक्षण देणाऱ्या शाळांच्या जोडीनेच उद्योगशाळा, हस्तोद्योग यांचे प्रशिक्षण पुरविणाऱ्या वर्गाची जोड देणे अशा उपक्रमांना मिशनच्या अंगभूत कार्याची अनिवार्य अंगे बनविणे, यांत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या ठायीचे प्रगल्भ द्रष्टेपण ठसठशीतपणे जाणवते.

विशेषतः, सरकारी नोकऱ्यांप्रमाणेच खासगी क्षेत्रातील रोजगारसंधींमध्येही आरक्षणाची तरतूद करण्याबाबत आज दडपण वाढत असताना महर्षींच्या त्या द्रष्ट्या प्रयत्नांचे मोल अधिक प्रकर्षाने भावल्याखेरीज राहत नाही. शिक्षणाची नाळ ही रोजगारसंधींशी जोडलेली नसेल तर अंतिमतः त्या शिक्षणाचे मोलही हरपते आणि समाजात निपजते ते केवळ नैराश्य, हा कार्यकारणभाव विठ्ठल रामजींनी अचूकपणे हेरला होता.त्यातही पुन्हा, अस्पृश्य गणल्या गेलेल्या समाजसमूहांमधील नवशिक्षितांच्या उपजीविकेचा मार्ग श्रेणीबद्ध समाजरचनेत अवरुद्ध होत असेल तर औपचारिक शालेय शिक्षणाला व्यवसायशिक्षणाची जोड अनिवार्यच ठरते, हे महर्षींचे सूत्र बिनतोड ठरते. कारण, नवशिक्षित दलित तरुण-तरुणींना नोकऱ्या जरी मिळाल्या नाहीत तरी, आधुनिक शिक्षणाच्या जोडीनेच व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केलेले हे नवशिक्षित उमेदवार त्या कौशल्यांच्या बळावर स्वयंरोजगाराच्या वाटा चोखाळू शकतील, असा रोकडा तर्क महर्षींनी बांधला होता. डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीच्या स्थापनेची शताब्दी साधून, आजमितीस, विठ्ठल रामजी शिंदे यांनी एक 'मिशन' म्हणून अंगिकारलेल्या या पैलूचे पुनरावलोकन आणि आकलन अगत्याचे ठरावे, ते नेमके यामुळेच.

विठ्ठल रामजी शिंदे यांची आचारविचाराची ही दिशा पक्की होण्यास कारणभूत ठरले ते त्यांनी बडोदा संस्थानात सयाजीरावमहाराजांनी अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गांतील मुलांसाठी चालविलेल्या शाळांचे केलेले निरीक्षण. धर्मशिक्षण घेऊन विठ्ठल

रामजी ६ ऑक्टोबर १९०३ रोजी भारतात परतले. स्वदेशी परतल्यावर प्रथम भेट घेण्याबाबतचे बडोदानरेशांचे पत्र त्यांना भारताच्या दिशेने प्रस्थान ठेवण्यापूर्वीच मिळाले होते. त्यानुसार, मायदेशी परतल्यावर महर्षींनी सयाजीरावमहाराजांची बडोदा येथे भेट घेतली. नीचवर्णीय समजल्या गेलेल्या समाजगटांतील मुलामुलींसाठी संस्थानतर्फे ज्या चार प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या होत्या त्या शाळांचे कामकाज पाहून त्या संदर्भात काही सूचना करण्याबाबत सयाजीरावांनी विठ्ठल रामजींना या भेटीदरम्यान सांगितले. उपेक्षित समाजघटकांसाठी शिक्षणाच्या संधी निर्माण करण्याचे महाराजांचे कार्य निःसंशय उच्च दर्जाचे असले तरी, केवळ रूढीबद्धतेपायी त्या कार्यास पडणाऱ्या मर्यादा विठ्ठल रामजींच्या ध्यानी शाळांच्या या पाहणीदरम्यान आल्या. कारण, परिश्रमपूर्वक विद्या संपादन केली तरी तिचे फळ मिळण्याबाबत कोणतीच सोय नसल्याने, अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या समाजगटांतील ही मुले मराठी पाचवी किंवा इंग्रजी दुसरी-तिसरीनंतर शाळा सोडून देतात, असे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या निरीक्षणास आले.

शिक्षण संपल्यावर पुढे नोकरीधंद्यात वाव नसल्याने मराठी पाचवी अथवा इंग्रजी दुसरी वा तिसरीचे शिक्षण संपताच ही मुले शाळा बंद करून हिंडत असत. प्रगत पुस्तकी शिक्षणाचा लाभ झाल्यामुळे आपल्या वडिलांचे परंपरागत (हलके) व्यवसाय अंगिकारण्यास ही मुले नाखूष असत. आपल्या जाती-वर्णाचा पारंपरिक अशोभनीय व्यवसाय करण्यापेक्षा रिकामे बसून दिवस काढणारी काही मुले रस्त्यावर हिंडत-भटकत असलेली महर्षींनी पाहिली. अस्पृश्य समजल्या गेलेल्या मुलांच्या नोकरीविषयी काहीतरी सोय करता आली तर पहावे, असे शिंदे यांनी सयाजीरावमहाराजांना प्रत्यक्ष भेटीदरम्यान सुचविले. तसेच, या मुलांना जर पुढे नोकरीत वाव मिळाला नाही तर त्यांच्यासाठी सुरू केलेल्या शाळांची वाढ तर होणार नाहीच, उलट त्या कितपत चालू राहतील, याबाबतची साशंकताही त्यांनी महाराजांपाशी व्यक्त केली. "हिंदू समाज त्यांना आपल्यातील एक म्हणून स्वीकारीत नाही. नोकरीच्या बाबतीत इतरांबरोबर समान संधी देत नाहीत म्हणून महाराजांची अमर्याद राजसत्ता आणि अमर्याद सहानुभूतीचा ओघ असूनदेखील हिंदू समाजाच्या सहानुभूतीच्या अभावी ह्या शाळांची फारशी प्रगती होऊ शकत नाही", असा अभिप्रायही विठ्ठल रामजींनी सयाजीरावमहाराजांना कथन केला. भविष्यकालीन संधींच्या अभावी, सयाजीरावांनी स्थापन केलेल्या शाळांमधील विद्यार्थी वैफल्यापोटी शिक्षण अर्ध्यावरच सोडून देतात आणि वाडवडिलांचा (अशोभनीय) पारंपरिक व्यवसाय करण्याकडे त्यांची प्रवृत्ती न उरल्याने रिकामपणास प्रतिष्ठा चढते,

हे अनुमान विठ्ठल रामजी शिंदे यांनी बडोदा संस्थानातील शाळापाहणी अनुभवांती पक्के केले. त्यातूनच, या मुलांना केवळ शालेय शिक्षण देणे पुरेसे ठरणार नाही तर, शालेय शिक्षणाच्या जोडीनेच त्यांना औद्योगिक शिक्षण देण्याचीही गरज आहे, अशी खुणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधली. १८ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन केलेल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीच्या कार्यकक्षेत विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्राथमिक शिक्षणाच्या बरोबरीनेच उद्योगशाळांच्या उपक्रमाचाही आवर्जून अंतर्भाव केला, हे या साऱ्या पार्श्वभूमीवर अत्यंत स्वाभाविक आणि तितकेच तर्कशुद्धही ठरते.

प्राथमिक अथवा दुय्यम शिक्षणाच्या सुविधा, उद्योगशाळा, वसतिगृहे, मोफत दवाखाना, धर्मशिक्षण तसेच नीतिशिक्षणाच्या साप्ताहिक शाळा आणि जातिभेद व मूर्तिपूजा यांना सोडचिठ्ठी देऊन चालविण्यात येणारी उपासनालये अशा सहा अंगांनी मिशनचे कार्य सुरू झाले. व्यवसायशिक्षणाच्या उद्दिष्टावर पक्के लक्ष ठेवून शिक्षणाच्या सुविधा पुरविण्याबरोबरच उपेक्षित समाजगटांमधील सुशिक्षित होतकरूंना नोकऱ्या मिळवून देणे, नोकऱ्या करणाऱ्यांसाठी रात्रशाळा चालविणे, महिलांमध्येही व्यावसायिक कौशल्यांची वाढ व्हावी या हेतूने शिवणकला वर्गांचे आयोजन सुरू करणे यांसारख्या बाबींना मिशनने अग्रक्रम दिला. मिशनची स्थापना झाल्यापासून तिसऱ्या वर्षीच,म्हणजे, १९०९ साली मिशनच्या या अंगाचा चांगलाच विस्तार घडून आल्याचे चित्र दिसले. मुंबईमध्ये सुरू करण्यात आलेल्या मिशनच्या नऊ शाळांच्या जोडीनेच पुस्तक बांधणीचे प्रशिक्षण, शिवणकला वर्ग या उपक्रमांबरोबरच शशिभूषण रथ व एका जर्मन तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली नवीन प्रकारचे बूट तयार करण्याचा 'परस्परसहाय्यक चामड्याचा कारखाना'ही सुरू करण्यात आला. तसेच, महाबळेश्वर येथे मिशनतर्फे चालविण्यात येणाऱ्या शाळेच्या जोडीनेच दोरखंड तयार करण्याचे आणि वेताचे विणकाम करण्याचे प्रशिक्षणही सुरू करण्यात आले. महाराष्ट्रातील या उपक्रमांच्या बरोबरच, कर्नाटकातील मंगळूर येथेही, हातमागांवर विणकाम करण्याचे प्रशिक्षण देणारी एक प्रशिक्षण संस्था सहा हातमागांच्या साहाय्याने चालू करण्यात आली.

"विद्यार्थ्यांच्या हातांना आणि डोळ्यांना व्यावहारिक वळण लागावे आणि तद्द्वारा विद्यार्थ्याला भावी आयुष्यामध्ये कोणता तरी हस्तकौशल्याचा धंदा करता यावा.....म्हणून अशा धंद्याची तयारी लहानपणापासून केली नाही तर ते पुढे पोकळ पंडित बनून आईबापांच्या आणि स्वतःच्या निराशेला कारणीभूत होतील", अशा भूमिकेतून उद्योगशाळांमधील वर्गांतून औद्योगिक शिक्षणाची रचना करण्यात आली

होती. मुंबईतील परळ येथील मिशनच्या शाळेला स्वतंत्र उद्योगशाळा जोडण्याची निकड महर्षींना १९१२ साली प्रकर्षाने जाणवू लागली. या उद्योगशाळेस निधीसाहाय्य मिळावे या हेतूने मुंबई येथील एन्. एम्. वाडिया ट्रस्टकडे अर्ज करण्यात आला. दरवर्षी सहा हजार रुपये या प्रमाणे तीन वर्षांत एकूण १८ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य पुरविण्याबाबत ट्रस्टकडून आश्वासन मिळताच नवीन उद्योगशाळा सुरू करण्यात आली. सुतारकाम, चित्रकला व रंगकाम, शिवणकाम, पुस्तक बांधणी असे चार वर्ग उघडण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी कोणत्या ना कोणत्या वर्गात दिवसातील दोन तास औद्योगिक शिक्षण घ्यावे, अशी अभ्यासक्रमाची घडी बसविण्यात आली.

उपेक्षित समाजघटकांच्या उन्नयनासाठी मिशनच्या माध्यमातून सुरू असणाऱ्या नानाविध उपक्रमांची माहिती अन्य समविचारी संस्थांच्या समोर यावी, मिशनच्या कार्यासंबंधी जनसामान्यांमध्येही सहानुभूती वाढावी अशा व्यापक हेतूंनी १९१२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये मिशनच्या वतीने महाराष्ट्र परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेदरम्यान व्हावयाच्या चर्चेसाठी जे विषय नियमित करण्यात आले होते त्या विषयसूचीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेला विषय होता - 'निराश्रित वर्गाच्या औद्योगिक शिक्षणाची दिशा' - हा. या संदर्भात बोलताना प्राचार्य केशवराव कानिटकरांनी निराश्रित वर्गांमधील होतकरूंच्या प्रगतीसाठी औद्योगिक शिक्षणाच्या आवश्यकतेवर भर दिला. आपल्या विवेचनादरम्यान, त्यांनी, व्यवसायशिक्षण घेतल्याने निराश्रित समाजघटकांमधून उद्योजक निर्माण होऊन त्यांनी कारखाने स्थापन केल्यास पदरी पांढरपेशे लिपिक नेमण्याचीही ऐपत त्यांच्या ठायी निर्माण होईल, या पैलूवर भर देत उपेक्षितांमधील उद्योजकतेला आवाहन केले.

डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटीच्या आणि तिच्या अनुषंगाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समग्र कार्याचा आढावा घेण्यास येथे अवसर नाही आणि तो हेतूही नाही. इथे स्मरणीय आहे ती महर्षी शिंदे यांनी उपेक्षित, शिक्षणापासून शतकानुशतके वंचित राहिलेल्या समूहांच्या समग्र उन्नतीसंदर्भात शतकभरापूर्वी प्रवर्तित केलेली एक आगळी दृष्टी. दरम्यानच्या काळात ती दृष्टी आम्ही कितपत अंगिकारली? औपचारिक शालेय शिक्षणाच्या जोडीनेच या समाजघटकांमध्ये व्यावसायिक-औद्योगिक शिक्षणाचाही प्रसार होणे गरजेचे आहे, हे महर्षींनी जपलेले 'मिशन' आम्हीही जोपासले असते तर आजचे काही प्रश्न उद्भवलेच नसते का ?... या प्रश्नांच्या दिशेने पुन्हा एकवार विचारविमर्श सुरू झाला तरी हे शताब्दीस्मरण कारणी लागले म्हणायचे ! ✿✿

# 'मल्टिकल्चरलिझम'

'माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे...' शालेय पुस्तकाच्या पहिल्याच पानावर छापलेल्या प्रतिज्ञेतील हे वाक्य कंठस्थ करीतच वाढलेल्या तुमच्या-माझ्यासारख्या भारतीयाला 'मल्टिकल्चरलिझम' वा 'बहुसांस्कृतिकता' हा वादविवाद निर्माण करणारा 'इश्यू' का व्हावा हे कोडे कदाचित कधीच उलगडणार नाही. परंतू, हे असे सध्या घडते आहे एवढे मात्र खरे... आणि त्याचमुळे, 'पानामागून आली आणि तिखट झाली' या म्हणीनुसार अवघे साडेतीन ते चार दशकांचे वय असलेली ही संकल्पना आज घरीदारी घोंघावते आहे. ११ सप्टेंबर २००१ या दिवसापासून तर ही संकल्पना वारंवारच कानांवर आदळू लागली. त्याहीनंतर, ब्रिटन, फ्रान्स, स्पेन यांसारख्या देशांमध्ये अलीकडील काळात उसळलेल्या हिंसक आणि रक्तरंजित घटनांमुळे तर या संकल्पनेवरून सांस्कृतिक जगताचे 'ग्लोबल वॉर्मिंग' होऊ लागले आहे की काय, अशी धास्तीच निर्माण झाली आहे. खरे पाहता, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारा एका विशाल खेड्यात रूपांतर झालेल्या जगाची आजची नेमकी संस्कृती कोणती, असा प्रश्न जर कोणी विचारला तर 'बहुविधसंस्कृती' हेच त्या प्रश्नाचे एकमात्र आणि निरपवाद उत्तर असेल, आणि असले पाहिजे. लोकसमूहांची आणि आपातत: विविध संस्कृतींची वेगवान सरमिसळ घडून येणाऱ्या आजच्या जगात कोणत्याही एका संस्कृतीला आणि तिच्या पाठीराख्यांना 'आमचीच संस्कृती तेवढी सर्वश्रेष्ठ वा परिपूर्ण' असा दावा करताच येणार नाही. अशा हेकेखोर दाव्याचे वैय्यर्थ हाच 'मल्टिकल्चरलिझम'चा 'इसेन्स' आहे. एखाद्या भूभागावर वा प्रदेशात नानाविध संस्कृतींचे नांदणारे सौहार्दपूर्ण साहचर्य, सर्वच संस्कृतींना प्रदान केला जाणारा समसमान सन्मान, आदर, प्रतिष्ठा, विविध संस्कृतींचा स्वयंसिद्ध समानाधिकार, कोणाही एका संस्कृतीचा वरचष्मा नसणे, वंश, वर्ण, भाषा, लिंग यांच्या आधारे वा यांच्या माध्यमातून अभिव्यक्त होणाऱ्या भेदभावाला संपूर्ण सोडचिठ्ठी हा 'मल्टिकल्चरलिझम' या संकल्पनेचा प्राण आहे. या संकल्पनेचे जनकत्व कोणा एखाद्या व्यक्तीकडे देणे शक्य नसले तरी गेली सुमारे चार दशके ही संकल्पना पाश्चिमात्य विचारविश्वात पाझरते आहे. अमेरिकी समाजात जरी हिचा उगम १९७०

व १९८०च्या दशकांदरम्यान झालेला आढळून येत असला तरी, कॅनडामध्ये मात्र अधिकृत धोरण म्हणून तिचा अंगिकार १९६०च्या दशकादरम्यानच केला गेला. अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या अमेरिकी-आफ्रिकी, लॅटिन अमेरिकी जनसमूहांनी आपापल्या समाजांची ऐतिहासिक पाळेमुळे शोधून काढण्याच्या प्रयत्नांमधून तिथे ही संकल्पना अवतरली. तिथून पुढे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकी राजकारण, समाजकारण तसेच अर्थकारणात एका चळवळीच्या रूपाने ही संकल्पना गाजू-गर्जू लागली. अमेरिकी संस्कृतीला युरोपीय अथवा ज्यूडो-ख्रिश्चन संस्कृतींच्या कोंदणात बळेच बसविण्यापेक्षा अमेरिकी संस्कृती म्हणजे आशियाई, आफ्रिकी, हिंदू अशा नानाविध संस्कृतींच्या संगमातून साकारलेली संस्कृती, हा विचार या चळवळीद्वारेच तेथील लोकमानसात स्थिरावतो आहे. असे असूनही, पाश्चिमात्येतर तत्वप्रणाली तसेच विचारव्यूहांना अमेरिकी राजकारण, प्रशासन तसेच समाजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही, अशी 'मल्टिकल्चरलिझम' या संकल्पनेच्या पाठीराख्यांची तक्रार आहे. अमेरिकेच्या मानाने युरोपमध्ये मात्र 'मल्टिकल्चरलिझम'चा स्वीकार करण्याबाबत मतमतांतरे अनुभवास येतात. कॅनडाने आपले अधिकृत धोरण म्हणून 'मल्टिकल्चरलिझम'चा अंगिकार केल्यानंतर अल्पावधीतच युरोपीय समुदायानेही त्याचा स्वीकार केला. परंतु, हा स्वीकार निरपवाद असल्याचे चित्र मात्र तेथे दिसत नाही. नेदरलंड्स् आणि डेन्मार्क या दोन देशांनी 'मल्टिकल्चरलिझम'कडे पाठ फिरवून पुन्हा आपल्या पूर्वापार एकविधसंस्कृतीची कास धरली. आजमितीस, त्याच पंथाने मार्गक्रमण करण्याबाबत ब्रिटन आणि जर्मनीमध्ये गंभीरपणे विचारविमर्श सुरू आहे. 'मल्टिकल्चरलिझम'च्या पर्यायाचा स्वीकार वा धिक्कार करण्याबाबत या संकल्पनेचे पाठीराखे आणि विरोधक आपापल्या परीने आग्रही दिसतात. पाठीराख्यांच्या मते बहुसांस्कृतिकतेद्वारे अधिक एकात्म अशा जागतिक संस्कृतीची जडणघडण होण्यास हातभार लागतो. विविध संस्कृतींच्या निकट साहचर्यामुळे परस्परांच्या भाषा, आचारविचार, तत्वप्रणाली, संगीत, धर्मश्रद्धा, पाककला, फॅशन्स यांचा जवळून परिचय होतो. आपसांतील देवाणघेवाण वाढते. तर, नेमक्या याच बाबींमुळे आपल्या सार्वभौमत्वावर आच येते, 'राष्ट्र-राज्य' संकल्पनेद्वारे अभिव्यक्त होणाऱ्या एकात्म, एकजिनसी सार्वभौमत्वाला तडा जातो, अशी भीती 'मल्टिकल्चरलिझम'च्या विरोधकांना वाटते. मतामतांच्या या गलबल्याच्या पार्श्वभूमीवर भारतामधील पुरातन बहुविधसंस्कृतिसमन्वय उठून दिसतो हे मात्र खरे !

# शांततेसाठी धर्मपरिषद !

धर्म-संस्कृतींनी बांधला गेलेला समाज उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येत असला तरी समाज, संस्कृती आणि धर्म यांच्यातील परस्परसंबंध हा आज चिंतेचा विषय बनला आहे. कारण, काही अतिरेकी संघटना धर्म-संस्कृतींना वेठीस धरून जगात हिंसाचार व दहशत माजवीत आहेत. त्यामुळे मोठ्या संख्येने नागरिक जेथे एकत्र येतात अशा ठिकाणी, विशेषतः उत्सवासाठी एकत्र आलेल्या नागरिकांमध्ये बॉबस्फोट घडवून आणून मोठ्या प्रमाणावर प्राणहानी, वित्तहानी करणे दहशतवाद्यांना सहज शक्य होते. त्यामुळे अलीकडे उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येण्यावर भीतीचे सावटही उभे राहिलेले दिसते. अशा शक्यतांमुळे सामाजिक सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उमटते. काळाच्या ओघात अशा घटनांची व्याप्ती वाढत जाते आणि देशादेशांमधील सामाजिक सुरक्षितता धोक्यात येऊ लागते. त्यामुळे जागतिक पातळीवर ही काळजीची बाब बनते. हीच काळजी अधोरेखित झाली आहे अलीकडेच झालेल्या जागतिक धर्मपरिषदेत.

जपानमधील क्योतो येथे २६ ते २९ ऑगस्ट २००६ या काळात आयोजित करण्यात आलेल्या जागतिक धर्मपरिषदेत शंभरावर देशांमधील ख्रिश्चन, मुस्लिम, ज्यू, झोरास्ट्रियन, शिंतो, बौद्ध, हिंदू, जैन आणि शीख अशा विविध धर्मांचे सुमारे ८०० अभ्यासक व प्रतिनिधी सहभागी झाले होते. हिंसाचार व सामाजिक सुरक्षा या विषयांप्रती सर्वांची जबाबदारी समानच असून त्यासाठी यापुढे जोमाने प्रयत्न करण्याची गरज आहे, असा विचार या परिषदेत मांडण्यात आला. तसेच या प्रयत्नांमध्ये धर्मांची भूमिका ही मध्यवर्ती असावी असेही या वेळी ठरले. या परिषदेतील जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे की, "हिंसाचारासाठी जर कोणी आमच्या धर्माचा आडोसा घेत असेल त्या धर्माचे अनुयायी म्हणून आमच्या धर्मांतर्गत होणाऱ्या हिंसाचाराला आम्ही रोखण्याचा प्रयत्न करू. त्याचप्रमाणे धर्मातील तत्त्वांचा विपर्यस्त अर्थ लावून त्याद्वारे हिंसाचार घडवून आणणाऱ्यांना आम्ही ठामपणे विरोध करू." या परिषदेला इराणचे माजी अध्यक्ष मुहम्मद खातमी, युनिसेफच्या कार्यकारी संचालक ॲन वेनेमन, नॉर्वेचे माजी अध्यक्ष केल बॉडेविक, बोलिव्हियाचे आर्च बिशप कार्डिनल ज्युलिओ टेरेझास, जॉर्डनचे राजपुत्र हसन बिन तलाल यांनी हजेरी लावली होती.

काही धार्मिक नेत्यांच्या पुढाकाराने या परिषदेची स्थापना होऊन शांततेसाठी जागतिक धर्मपरिषद सर्वप्रथम क्योतो येथे १९७० मध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर १९७४ मध्ये बेल्जियम, १९७९ मध्ये अमेरिका, १९८४ मध्ये केनिया, १९८९ मध्ये ऑस्ट्रेलिया, १९९४ मध्ये इटली आणि १९९९ मध्ये जॉर्डन येथे या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी झालेल्या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे इस्रायल, पॅलेस्तिन, लेबनॉन, सुदान, कांगो अशा हिंसाचारग्रस्त भागांतील धार्मिक नेते तसेच इराकमधील शिया, सुन्नी आणि ख्रिश्चन नेतेही येथे एकत्र आले होते. धर्मभेदाच्या पलीकडे जाऊन या सर्वांनी हिंसाचार रोखण्यासाठी व सामाजिक सुरक्षावाढीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे ठरविले. या परिषदेत विविध धर्मांतील तरुण व स्त्रिया यांनाही सहभागी करून घेण्यात आले होते. त्यांचे विचार जाणून घेऊन त्यांना शांततेसाठी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

इराणचे माजी अध्यक्ष मुहम्मद खातमी यांनी आपल्या भाषणात इतिहासकाळापासून आजपर्यंतच्या हिंसाचाराचा आढावा घेतला. मानवी समाजाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत हिंसाचार हा एक महत्त्वाचा घटक ठरला आणि विसाव्या शतकात दोन महायुद्धांमुळे त्याचे सर्वात भीषण रूप आपल्याला दिसून आले. स्थित्यंतराच्या या सर्व काळात मार्क्सवादाचा प्रयोगही झाला आणि विसाव्या शतकाच्या अखेरीस तोही मागे पडला. सध्या भांडवलशाहीचा विचार पुढे येत असून मानवतावादी दृष्टिकोण मागे पडतो आहे. हे पाहता गरिबी, एकधिकारशाही यांच्या विरोधात आता उभे ठाकण्याची गरज आहे, असे दिसते. त्यामुळे हिंसाचार वाढून सामाजिक सुरक्षेला हानी पोहचते का हेही तपासून पाहिले पाहिजे. तसे होत असल्यास त्याला प्रतिबंध करण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोणातून अनेक चळवळी उभ्या राहिल्या पाहिजेत. कारण, सामाजिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची ही वेळ आहे. ही सुरक्षा प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे. संयुक्त राष्ट्रसंघ, ऑर्गनाइझेशन ऑफ इस्लामिक कॉन्फरन्स यांसारख्या संस्थांना महत्त्व मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले. ✿✿

‘जिकडे-तिकडे’ या सदरात ‘जपान : राजघराण्याची रंगसूत्रे’ (जून २००६) या छोटेखानी लेखात जपानमधील वारसदाराबाबतची चर्चा प्रसिद्ध करण्यात आली होती. अलीकडेच जपानच्या राजघराण्यात पुत्रजन्म झाल्याने या चर्चेला विराम मिळाला आहे.

## 'काल'चे 'आज'साठी

### स्वच्छता व्रत जो सांभाळी, त्याची खरी दसरा-दिवाळी

ऐसे उत्सवाचे नाव घेवोनि/ धन व्यर्थ उधळू नये कोणी/
ते लागावे सत्कारणी/ बोलिलो म्हणोनि बचत करा//
नाहीतरि घरी दिवाळी केली/ दिवाळे निघावयाची सोय झाली/
जनता हसेल गावातली/ 'हौसी नटराज' म्हणोनि//
एके दिवशी सण केला/ ते भोगणे आले दुसऱ्या दिवसाला/
ऐसा कोणीच नाही सांगितला/ गृहस्थ धर्म//
काही प्रसंगमानासाठी/ पैसा ठेविला पाहिजे गाठी/
सण येताचि उठाउठी/ खर्चू नये सर्व शक्ति//
दिवाळीचा सण आला/ सर्वांनीच पाहिजे केला/
परि पाहावा कोण राहिला/ भुकेला घरी//
गावी ज्याने लक्ष्मी नांदे/ लोक जगतील आनंदे/
ऐशा प्रयत्नांनीच साधे/ खरी दिवाळी//
बारा महिन्यांनी दिवाळी आली/ घरेदारे स्वच्छ झाली/
भिंत - ओसरी सारवोनि ठेविली/ रंगरंगोटी लावोनि//
दुसरे दिवशी सडा नाही/ झाडझूड तीहि नाही/
घाण पसरली सर्वहि/ जिकडे तिकडे//
ऐसी करिता दसरा, दिवाळी/ अवदशाचि येई कपाळी/
त्यापेक्षा रोज सकाळी/ उठणे हाचि दिवाळसण//
सण म्हणोनि करावे अभ्यंगस्नान/ नाहीतरि फासावे वंगण/
हे कोठचे शहाणपण/ शिकलो आम्ही ?॥
दिवाळीचे निमित्त करोनि/ स्वच्छता, पवित्रता शिकवावी सर्वांनी/
उकिरडाहि नीट करोनि/ दिवा लावावा स्वच्छतेचा//
ऐसे व्रत जो सांभाळी/ त्याची खरी दसरा, दिवाळी/
नाहीतरि समजा होळी/ आपुल्या साऱ्या जीवनाची//

'व्यष्टी' आणि 'समष्टी' यांचा सम्यक् विचार हा आपल्या सगळ्याच सणांचा गाभा आहे. किंबहूना, व्यक्तीला समाजाशी जोडणे, हाच सण-उत्सव साजरे करण्यामागील एक प्रधान हेतू आहे. केवळ आपल्यापुरते पाहणे, आपल्याच घरात बसून आपल्या ताटातील फराळावर ताव मारणे आणि आपली दिवाळी कशी छान मजेत साजरी झाली म्हणून आनंदात मश्गूल राहणे, हे दिवाळीचे मर्म न समजल्याचेच लक्षण मानावयास हवे ! म्हणूनच, अभ्यंग स्नान करून, समोर आलेल्या औरसचौरस फराळावर यथेच्छ आडवा हात चालवत असतानाच, गावातील एखाद्या घरात कोणी उपाशी तर राहिले नाही ना, याचे भान प्रत्येकाने सजगपणे राखावे असे तुकडोजी या ठिकाणी कळकळीने बजावतात. केवळ एवढेच नाही तर, गावातील लहानथोर आनंदाने नांदावेत, त्यांच्या प्रपंच-परमार्थासाठी पुरून उरेल इतके धनधान्य त्यांच्यापाशी असावे, गावावर लक्ष्मीचा वरदहस्त राहावा यासाठी प्रयत्नशील राहणे म्हणजेच दीपावलीचा सण साजरा करणे, अशी 'दिवाळी'या संकल्पनेची नवीन व्याख्याही तुकडोजी इथे मांडतात. सणावाराच्या निमित्ताने आपापले घरअंगण तर आपण सगळेच साफस्वच्छ करतो. मात्र, त्याच दिवाळीच्या सणाला वेढून असलेले आत्मसंतुष्टतेचे संकुचित कुंपण गळून पडले की स्वच्छतेच्या ध्यासाचा तोच परीघ पार गावच्या उकीरड्यापर्यंत विस्तारतो आणि घराच्या अंतरंगाइतकाच तो उकिरडाही निर्मळ बनवतो. दिवाळीचा हा व्यापक अर्थ एकदा का आकळला की त्या सणाचे आपल्या जीवनातील स्थानच पार बदलून जाते. आश्विन वद्य त्रयोदशीपासून ते कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत साजरा करण्याचा एक आनंदोत्सव, इतकेच मर्यादित आणि तात्कालिक स्वरूप मग दिवाळीला उरत नाही. दिवाळी हा निव्वळ 'सण' न उरता त्याचे रूपांतर व्रतामध्ये होते. नियम हा तर कोणत्याही व्रताचा प्राण. नियमात शिस्त अंतर्भूत असते. शिस्तीमध्ये अनुस्युत असतो संयम. हा संयमही असातसा बाहेरून कोठूनतरी कोणीतरी बळेच लादलेला नसतो. त्या संयमाला अधिष्ठान असते ते विवेकाचे. गावच्या कुंभकाराने घडविलेल्या सुबक पणत्या आपल्या स्निग्ध प्रकाशाने घरादाराचा कानाकोपरा उजळून टाकतात तर, विवेकाचा हा अक्षय तेवणारा दीप मग आपल्या आंतरविश्वाचा सांदीकोपरा प्रकाशमान करतो. मग दिवाळी म्हणजे अफाट खर्च, दिवाळी म्हणजे एकच दिवस करावयाचे पहाटेचे अभ्यंग स्नान, दिवाळी म्हणजे चार दिवसांच्या स्वच्छतेचा चकचकाट अशी कोती समीकरणे लयाला जातात. विवेकाचे हे अधिष्ठान एकदा का अंतःकरणात दृढ झाले की जीवनात बहरते नित्य दिवाळी.तुकडोजींना अभिप्रेत असणारी दिवाळी ही अशी आहे !

(पृष्ठ क्रमांक ४ वरून)

आपल्या 'अर्थबोधपत्रिके'चा ऑगस्टचा अंक नेहमीच्या सवयीप्रमाणे एका दमात वाचून काढला. आपले सगळेच अंक माहितीपूर्ण व वाचनीय असतात व हा अंकही त्याला अपवाद नाही. 'माणसाची गोष्ट', 'क्लोनिंगचे स्वप्न विरले', 'रशियाचे तैलास्त्र', 'जगभरातील नागरीकरण' हे लेख तर आवडलेच पण विशेष उल्लेख करावासा वाटतो तो वृद्धत्व : 'समस्या' की 'विषय' या लेखाचा. वृद्धत्व ही समस्याच आहे हे आजच्या तरुण पिढीच्या बाबतीत, (अपवाद वगळता) सत्यच आहे. एवढे गंभीर विषय असूनही भाषेमध्ये सहजता आणि लालित्य आले आहे, हे या वेळी प्रथमच जाणवले. 'मामाच्या गावाला नेणाऱ्या रेल्वेशी मैत्री करायची आणि पळती झाडे पाहात विविध ठिकाणचा बदलता भूगोल रेल्वेच्या खिडक्यांमधून मनात साठवायचा' ही कल्पना गोड असली तरी व्यावहारिक वाटत नाही. 'काल'चे 'आज'साठी या सदरात आपण संत तुकडोजी महाराजांचे विचार मांडत आहात ते आजच्या काळासाठी चपखल बसतात. हे सदर स्तुत्य आहे.

**मोहना मार्डीकर, नागपूर**

## हॉलंडमधील बाळगोपाळांची कंदिलयात्रा

मूल्यशिक्षणासाठी शालेय वय हे महत्त्वाचे मानले जाते. मूल्यशिक्षणाचे पाठ केवळ पुस्तकी असून चालत नाही तर ते जीवनव्यवहारांतूनच मिळवावे लागतात. मग ती घटना कितीही छोटी असो वा मोठी. किंबहुना अनेकदा छोट्या गोष्टीच मूल्यशिक्षणासाठी महत्त्वाच्या ठरतात. मूल्यशिक्षणाचा पाठ गिरवणारी हॉलंडमधील बाळगोपाळांची कंदिलयात्रा याच प्रकारातील. हॉलंडमध्ये प्रतिवर्षी ११ नोव्हेंबर रोजी बालचमूची यात्रा निघते. ही मुले घरोघरी जाऊन गाणे म्हणतात आणि त्यांचे गाणे संपल्यावर घरातील मंडळी त्यांना खाऊ देतात. हे गाणे असते सेंट मार्टिनचे आणि त्या वेळी मुलांच्या हाती असतो कंदील (मूल्यशिक्षणाची दिशा म्हणून ?..). या मागे कथा अशी सांगितली जाते की कोणे एके काळी हॉलंडमध्ये मार्टिन नावाची सहृदय व्यक्ती होती. एकदा भर थंडीत मध्यरात्री घरी जात असताना मार्टिनला रस्त्यात अतिशय गरीब माणूस भेटला. त्याच्या जवळ ना ल्यायला वस्त्र होते ना खायला अन्न. मार्टिनजवळही फक्त एक पांघरूण व एक छोटासा पावाचा तुकडा होता. पण दयाळू मार्टिनने त्यातील निम्मे पांघरूण व निम्मा पाव त्या गरीब व्यक्तीला देऊन त्याला मदत केली. या छोट्याशा कृतीने मार्टिन संतपदाला पोहचला. सेंट मार्टिनची आठवण म्हणून मूल्यशिक्षण देणाऱ्या या घटनेचे स्मरण केले जाते.

# संदर्भसूची

(1) www.lynncoins.com/chinese_new_year.htm
(2) www.bbc.co.uk/dna
(3) www.uen.org/utahlink
(4) www.sunsite.au.ac.th/thailand
(5) www.rampantscotland.com
(6) www.samui.org
(7) www.everythingesl.net
(8) www.varchive.org/itb
(9) www.123chinesenewyear.com
(10) www.chiangmai-chianrai.com
(11) www.serve.com/shea
(12) www.iaw.on.ca
(13) www.worldandi.com
(14) www.iranian.com/history
(15) www.china.org.cn/
(16) www.edua.uvic.ca
(17) www.yangonow.com
(18) Dharmaworld - July-sept. 2006
(१९) भारतीय संस्कृतिकोश - संपादक - महादेवशास्त्री जोशी, खंड १ पृष्ठ क्र. ३८९-९० व ६४२-४३, खंड ४ - पृष्ठ क्रमांक ३८८ते ३९३.
(२०) सुलभ विश्वकोश - संपादक - य. रा. दाते, चिं. ग. कर्वे भाग ३ पृष्ठ क्र. ११९०
(२१) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य - लेखक - गो. मा. पवार, लोकवाङ्‌मयगृह, मुंबई मे २००४.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

■Mid-Year Review of the Indian Economy - 2005-2006 : Rao M. Govinda : Shipra Publications, New Delhi, 2005.

■Bail Outs or Bail Ins? - Responding to financial Crises in Emerging Economies : Roubini Nouriel and Sester Brad; Viva Books Pvt. Ltd; New Delhi, 2006.

■Controlling Currency Mismatches in Emerging Markets : Goldstein Morris and Turner Philip; Viva Books Pvt. Ltd; New Delhi, 2006.

■The United States and the World Economy - Foreign Economic Policy for the Next Decade : Bergsten C. Fred ; Viva Books Pvt. Ltd; New Delhi, 2006.

■We are poor but so many - The story of Self-Employeed Women in India : Ela Bhatt, Oxford University Press., Oxford, 2006.

■Making Global Trade Work for People : UNDP Earthscan Publications; USA, 2005.

■Fifty Key Thinkers on Development : Simon David (Ed.) Routeledge London, New York 2006.

■From Marx and Mao to the Market - The Economics and Politics of Agricultural Transition; Swinnen Johan F.M. Rozelle Scott Oxford University Press., Oxford, 2006.

■Intellectual Property and Competitive Strategies in the 21st Century : Alikhan Shahid and Mashelkar Raghunath, Aditya Books Pvt. Ltd; New Delhi, 2006.

■Gopal Krishna Gokhale - His Life and Times : Talwalkar Govind; Rupa & Co. New Delhi; 2006.

■Capitalism Unleashed - Finance Globalization and Welfare, Glyn Andrew; Oxford University Press., Oxford, 2006.

■The Global Competitiveness Report : 2005-2006 : Dr. Claros Augusto Lopez; Palgrave Macmillen; New York, 2005.

■Aspects of India's Economic Growth and Reforms : Nagaraj R.; Academic Foundations; New Delhi; 2006.

■To the Nation for the Nation - Selections from selected Speeches of Dr. Manmohan Singh : Kapila Raj; Academic Foundations; New Delhi; 2006.

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक( 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**